ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या वतीने हैदराबाद येथे होणाऱ्या आंतरजिल्हा राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स संघाची निवड चाचणी गुरुवार २२ ऑक्टोबर २०२६ रोजी के बी पी कॉलेज पंढरपूर येथे आयोजित केली आहे. चाचणी प्रवेश अर्ज स्पर्धा ठिकाणी सकाळी ९-०० वाजता स्विकारले जातील. या निवड चाचणी स्पर्धेत १४ वर्षांखालील मुले व मुलींच्या ६ तर १६ वर्षांखालील ७ खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. १४ वर्षांखालील गटासाठी अ, इ व उ याट्रायथलॉन क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. १६ वर्षांखालील गटासाठी ६० मीटर धावणे, ६०० मीटर धावणे, ८० मीटर अडथळा शर्यत, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, भालाफेक व या क्रीडा प्रकारांत निवड चाचणी घेण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी ९३२६०५५९४० अथवा चेतन धनवडे ९९२१११४१४२ यांच्याशी संपर्क साधावा.



सोलापूरला तिहेरी मुकुट



राज्य सबज्युनियर व ज्युनियर डॉजबॉल स्पर्धा

छत्रपती संभाजीनगर दुहेरीचा मानकरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ ऑक्टोबर-

५वी सबज्युनियर व ४थी ज्युनियर राज्य अजिंक्यपद डॉजबॉल स्पर्धेत सोलापूरने सबज्युनियर व ज्युनियर मुलांच्या गटात विजेतेपद व ज्युनियर मुलींच्या गटात तृतीय स्थान मिळवित तिहेरी मुकुट संपादिला.

डॉजबॉल स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ म हाराष्ट्र यांच्या मान्यतेने, डॉजबॉल असोसिएशन सोलापूर व पार्थ कला क्रीडा शैक्षणिक बहुउद्देशीय संशोधन संस्था, श्री मल्लिकार्जुन हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमानेही ही स्पर्धा आयोजित केली होती. बक्षीस वितरण डॉजबॉल असोसिएशन ऑफ सोलापूरचे जिल्हाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे यांच्या हस्ते, राज्य महासचिव एकनाथ साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली व विशेष अतिथी म्हणून जिल्हा डॉजबॉल संघटनेचे संचालक धरेप्पा हत्तुरे, प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या प्रसंगी राज्य डॉजबॉल संघटनेचे उपाध्यक्ष संगम डंगर रायगड, महेंद्र कुमार मोटघरे नाशिक, राज्यसहसचिव रमेश शिंदे जालना, कोल्हापूरचे सचिव संजय जाधव,विनायक हत्तुरे यांची उपस्थिती होती

या स्पर्धेसाठी पंच म्हणून सागर तांबे सपना जाधव करुणा साळवे संभाजीनगर अक्षय डेंगळे विजय चव्हाण जालना, सुशांत जुळवे , सतीश मोकल रायगड हे कामपाहत आहेत

या स्पर्धा आयोजन व नियोजनाचे सचिव प्रा.संतोष खेंडे, खजिनदार गंगाराम घोडके परमेश्वर चांदोडे, संतोष पाटील खराडे यांनी परिश्रम घेतले. राज्य संघटनेचे सहसचिव प्रा. संतोष खेंडे यांनी सूत्रसंचालन केले व खजिनदार गंगाराम घोडके यांनी आभार मानले.

अंतिम निकाल (प्रथम चार) : सब ज्युनियर मुली : छत्रपती संभाजीनगर, रायगड, नाशिक **मुले :** सोलापूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव

ज्युनियर मुली : छत्रपती संभाजीनगर, रायगड, सोलापूर **मुले:** सोलापूर, जालना, नाशिक रायगड.



पत्रकार शिवाजी सुरवसे 'रोटरी चेंज मेकर व्हाईस अवॉर्ड'ने सन्मानित

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १९ ऑक्टोबर-

पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यालयाबद्दल रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या वतीने येस न्यूज मराठीचे संपादक शिवाजी सुरवसे यांना सन २०२६-२७ चा रोटरी चेंज मेकर व्हाईस अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. उद्योजक जयेश पटेल यांच्या हस्ते शिवस्मारक सभागृहात रविवारी हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी रोटरी क्लब ऑफ नॉर्थच्या अध्यक्षा आसावरी सराफ, प्रोजेक्ट हेड डॉक्टर सचिन कोठारी, रोटरीचे सचिव विष्णू रंगरेज, युथ डायरेक्टर डॉ. सचिन जन्मा, पवन अग्रवाल, दिनेश अग्रवाल, रोटरॅक्ट क्लब ऑफ सामर्थ्यच्या लब्दी शहा, भार्गव मोंढे, सुरभी देशपांडे आदी उपस्थित होते. यावेळी युवकांना दिशा देणारा कार्यक्रम संपन्न झाला. रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर जयेश पटेल यांची तरुणांना सोलापुरातच उद्योग उभा करावे, जिद्द चिकाटी आणि परिश्रम करण्याची तयारी असेल तर यश निश्चित मिळेल असे सांगितले.

अक्कलूजमध्ये अत्याधुनिक अग्निशमन केंद्र उभारणार

शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांची माहिती

तभा वृत्तसेवा,
अक्कलूज, दि. १९ ऑक्टोबर -

अकलूज नवीन बाजारतळ येथे अत्याधुनिक अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. यासाठी एक कोटी ९० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.



अकलूज येथील नवीन बाजारतळ परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकाम ांची पाहणी करण्यासाठी मोहिते-पाटील यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी फळे व भाजीपाला विक्रेत्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. या वेळी त्यांनी प्रस्तावित अग्निशमन केंद्राची माहिती दिली. यावेळी नगराध्यक्षा रेशमा अडगळे, नगरसेवक सयाजीराजे मोहिते-पाटील, विलास क्षीरसागर, प्रतिभा गायकवाड, अझर शेख, मिलिंद कोतमिरे आदी उपस्थित होते.

अकलूजची वाढती व्याप्ती लक्षात घेता ही सोय करत आहे. नवीन बाजारतळ येथे अग्निशमन केंद्र उभारल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचविण्याची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.त्यासाठी मंजूर निधीमध्ये एक कोटींचे केंद्र व ९० लाख रुपये किमतीचे अत्याधुनिक अग्निशमन याचा समावेश आहे. केंद्रासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचेही शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या कार्यकाळाला २ वर्षे पूर्ण

गुन्हेगारीवर जरब बसवत निर्माण केले विश्वासाचे नाते

तभा वृत्तसेवा,
वैराग, दि. १९ ऑक्टोबर -

कल्पक उपक्रमांनी संपूर्ण जिल्ह्यात 'खाकी'ची एक नवी, आदरयुक्त आणि पर्यावरणपूरक ओळख निर्माण करणारे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या कार्यकाळाला २ वर्षे पूर्ण झाली आहेत.

जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी १५ ऑगस्ट २०२४ रोजी सोलापूर ग्रामीणचा पदभार स्वीकारल्यापासून आज दिनांक २० ऑक्टोबर २०२६ पर्यंत, केवळ गुन्हेगारीवरच जरब बसवली नाही, तर सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा एक नवा आदर्श महाराष्ट्रासमोर ठेवला आहे. जिल्ह्यात पाऊल ठेवताच सण आणि उत्सवांना पारंपरिक व पर्यावरणपूरक स्वरूप देण्यावर भर दिला. यंदाच्या गणेशोत्सवात त्यांनी ' नो डिजे, नो डॉल्बी' ची अत्यंत प्रभावी मोहीम राबवली. तसेच १००० रोपे लावणाऱ्या गणेश मंडळांना आरतीला येण्याचे आश्वासन दिल्याने जिल्ह्यात गणेशोत्सवादरम्यान तब्बल ६० ते ७० हजार झाडे लावली गेली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी यात्रा काळात 'हरित वारी' उपक्रम राबवून आषाढी वारीच्या मार्गावर आणि सोलापूर-अक्कलकोट रोडसह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली. अलीकडेच ऑक्टोबर २०२६ मध्ये त्यांच्या संकल्पनेतून तब्बल '४ लाख वृक्षलागवडीचा' अवाढव्य आणि ऐतिहासिक टप्पा सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने यशस्वीपणे पूर्ण केला आहे. खाकी वर्दीतील एका अधिकाऱ्याने सुरू केलेले हे 'हरित आंदोलन' जिल्ह्याला वाळवंटीकरणाकडून समृद्धीकडे नेणारे ठरत आहे.

ग्रामीण भागातील दारिद्र्य, व्यसनाधीनता आणि गुन्हेगारी मुळापासून उपटून काढण्यासाठी त्यांनी जिल्ह्यातील संवेदनशील गावांना दत्तक घेण्याची अभिनव संकल्पना राबवली. बालमनावर पोलिसांची भीती राहू नये आणि विशेषतः शाळकरी मुलींना सुरक्षित वातावरण मिळावे म्हणून त्यांनी शाळा-म हाविद्यालयांमध्ये 'पोलीस काका' आणि 'पोलीस दीदी' हे अभियान अत्यंत प्रभावीपणे राबवले. जून २०२६ म ध्ये एकाच वेळी ७२४ पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून प्रदीर्घ काळ ठाण मांडून बसलेल्या हितसंबंधांना सुरुंग लावला. याशिवाय बेकायदेशीर ऑर्केस्ट्रा बार, अवैध दारू आणि दुधातील भेसळ करणाऱ्यांवर त्यांनी मोठी धडक कारवाई सत्र चालवले. वाढत्या सायबर गुन्ह्यांचा छडा लावत शेअर मार्केटच्या नावाखाली फसवणूक झालेल्या नागरिकांचे लाखो रुपये त्यांनी परत मिळवून दिले.

सोलापुरात 'वर्थ कॅपिटल'च्या नव्या शाखेस सुरवात



तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर

वाहन कर्ज क्षेत्रातील अग्रगण्य आणि भारतीय रिझर्व्ह बँकेकडे नोंदणीकृत बिगर बँकिंग वित्तीय कंपनी (NBFC) असलेल्या 'वर्थ कॅपिटल'ने महाराष्ट्रातील आपल्या विस्ताराला सुरुवात केली असून येथे नवीन शाखेचे उद्घाटन जुळे सोलापूर येथील भगवती टॉवर्स, दावत चौक येथे झाले.

'एम्पॉवरिंग मोबिलिटी, एनेबलिंग ड्रीम्स' (वाहतुकीला बळ, स्वप्नांना दिशा) हे ब्रीदवाक्य घेऊन कार्यरत असलेल्या वर्थ कॅपिटलची ही नवीन शाखा सोलापूर आणि परिसरातील ग्राहकांच्या वाहन कर्ज व मालमत्ता वित्तपुरवठ्याच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. सोलापूर शाखेच्या काम काजाची जबाबदारी आरबीएच चंद्रकांत पाटील, बीएच. प्रवीण ढवळे आणि त्यांची अनुभवी टीम सांभाळणार आहे. या शाखेचे उद्घाटन डॉ. नंदकुमार भुतडा (संचालक, आशीर्वाद मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, पुणे) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वर्थ कॅपिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी. शिवप्रसाद भुतडा आणि मुख्य परिचालन अधिकारी बी. एम. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

विविध प्रकारच्या वाहनांसाठी कर्ज सुविधा

वर्थ कॅपिटलच्या माध्यमातून ग्राहकांना कार व व्यावसायिक वाहने, ट्रॅक्टर तसेच प्रवासी वाहने आणि पिकअप वाहनांसाठी कर्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत. ग्राहकांना सुलभ सेवा देण्याच्या उद्देशाने कंपनीकडून जलद कर्जमंजुरीसह विविध आर्थिक सुविधा पुरविण्यावर भर दिला जाणार आहे. सोलापूरमधील नवीन शाखेमुळे परिसरातील वाहन खरेदीदार, व्यावसायिक आणि शेतकऱ्यांना वाहन वित्तपुरवठ्याच्या सुविधा अधिक सहजपणे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्रातील विस्ताराच्या दृष्टीने सोलापूर शाखेची सुरुवात हा कंपनीसाठी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील उत्तर कसबा येथील म्यु. पल घर नं. ७१७, ७१८ यांसी सिटी सर्व्हे नं. १५६/१ एकत्रिकरणानंतरचे यासी एकूण क्षेत्र १७७.२ चौ.मी यामधील बांधण्यात आलेलया अकबर कॉम्प्लेक्स अपार्टमेंट कंडोमिनियम मधील दुसरा मजलयावरील फ्लॅट नं. २०२ यासी कारपेट क्षेत्र २८.७० चौ. मी. २ बीएचके फ्लॅट जागा आज रोजी इसारा पावती करारपत्रा द्वारे लिहून घेणार यांना देत आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

यासी चतुःसीमा खालीलप्रमाणे :- पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस :- सि. सर्व्हे नं. १५६१/३, दक्षिणेस :- रस्ता, उत्तरेस :- रस्ता सदर वर नमूद फ्लॅट जागा १. म सरफराज अ अजीज शेख २. आसमा फरहीन म. सरफराज शेख यांच्या मालकी कब्जे वाहिवाटीचे आहे. तरी फ्लॅट जागेचे मालक यांनी आमचे अशिल यांना सदर फ्लॅट जागा विक्री करण्याचे ठरवून व्यवहार केलेला आहे. तरी त्या अनुषंगाने वर नमूद फ्लॅट जागा ही निर्वेध निजोखमी असल्याबाबतची हमी सदरहू मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितंबंध गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमूद फ्लॅट जागा ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे दिनांक १९/१०/२०२६.

सही/-
ॲड. सरफराज अ. शेख
बी.ए., एम.एस.डब्ल्यू., एलएल.एम.
कार्यालयाचा पत्ता : दुकान क्र. ११०, पहिला मजला, दारुस सलाम अपार्टमेंट, १२७, सिध्देश्वरर पेठ, सोलापूर - ४१३००१, मोबाईल क्र. ९६६५११३०४८

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः ता. बार्शी पैकी शहर बार्शी व आसपासचे लोकांस खालील सही करणारे आमचे अशिलातर्फे सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पेकी मौजे बार्शी येथील ग.नं. १२२२/२ याचे संपूर्ण क्षेत्र ०० हे.८१ आर. आकार ०० रु.३७ पैसे या जमीनीपैकी दक्षिण बाजूची संपूर्ण जमीन याचे क्षेत्र ०० हे. ४१ आर आकार २० रु.१९ पैसे याची चतुः सिमा :- पुर्वेस - बार्शी धसपिंपळगाव रस्ता, दक्षिणेस - ग.नं.१२२१/१ ची जमीन, पश्चिमेस - शिदे यांची जमीन व उत्तरेस - आरीफ अब्दुलरहीम मुल्ला यांची जमीन येणेप्रमाणे मिळकत ही आतील झाडझुडुप, दगड, माती वगैरे सर्व तदंगभूत वस्तु व वहिवाटीचे हक्कासह

वर नमूद मिळकत ही शरीफ अब्दुलरहीम मुल्ला व त्यांचे भाऊ आरीफ अब्दुलरहीम मुल्ला यांची समाईक मालकीची व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदरील मिळकत शरीफ अब्दुलरहीम मुल्ला यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढून ती आमचे अशिलास कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून इसारापोटी काही रक्कम घेतलेली आहे व इसारपावतीचा दस्तही लिहून दिलेला आहे. सदर दस्तास आरीफ अब्दुलरहीम मुल्ला यांनी मान्यता देणार म्हणून सही केलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याची हमी व खात्री विद्यमान जमीन मालकानी आमचे खरेदीदार अशिलास दिलेली आहे.

याउपर नमूद मिळकतीबाबत कोणाचे काही साठेखत, गहाणखत, वारसा हक्क वहिवाटीचा हक्क, नजर गहाण, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचे हस्तांतराचे व्यवहार असलेस संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकती खालील पत्यावर द्याव्यात अन्यथा नमूद मिळकत निर्वेध, निजोखमी व खरेदी योग्य आहे असे समजून ठरले मुदतीत कायम खुषखरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मग मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे ही जाहीर नोटीस दिली, तारीख : १९/१०/२०२६

सही/-
ॲड. श्री. सचिन हिरालाल नायकोजी
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
ता. बाशी, जि. सोलापूर
मो.नं. ८४५९३४०५९९
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E-Tender Notice

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000038870 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 26/2026-27, Particulars:** Work of Annual contract for the work of servicing, overhauling and repairing of 220kV, 132kV AREVA/ALSTON make EHV Circuit Breakers (CBs), with required spares at various EHV substation under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 1,84,16,757/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 1,84,167/- **Tender cost in Rs.** 5000.00+ GST, **Sale period:** 17.10.2026 to 27.10.2026 **Last Date of Submission:** 27.10.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 28.10.2026 at 12:30 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer -8554995014 For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal please visit.

1) https://srmetender.mahatransco.in.

2) https://mahatransco.in

Note: All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डी ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील दहिटणे येथील शियप्रिया पार्क या नावाने ओळखले जाणार वसाहती मधील बिनशेती खुली प्लॉटजागा यांसी वर्णन खालीलप्रमाणे.

सर्व्हे नं.	प्लॉट नंबर	क्षेत्र
३९/३	१७	७५.९३ चौ.मी किंवा ०.७५.९३ आर चौ.मी

यासी चतुःसीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस :- ९ मी रस्ता, पश्चिमेस :- सर्व्हे नं. ३९/२, दक्षिणेस :-प्लॉट नं. १८, उत्तरेस :- प्लॉट नं. १६

सदर वर नमूद प्लॉट जागा १. विकास भारत जगताप २. शरद भारत जगताप यांच्या मालकी कब्जे वाहिवाटीचे आहे. तरी प्लॉट जागेचे मालक यांनी आमचे अशिल यांना सदर प्लॉट जागा विक्री करण्याचे ठरवून व्यवहार केलेला आहे. तरी त्या अनुषंगाने वर नमूद प्लॉट जागा ही निर्वेध निजोखमी असल्याबाबतची हमी सदरहू मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तरी वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचीही, कसल्याही प्रकारचे हक्क, हितंबंध गहाण, दान, लिज, लीन, टाच, पोटगी व इतर कायदेशीर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी आपली हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल वर नमूद प्लॉटजागा ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही, कसलीही प्रकारची तक्रार अथवा हरकत चालणार नाही, कोणाची फसवणूक, गैरसोय, नुकसान होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे दिनांक १९/१०/२०२६.

सही/-
ॲड. हुसेन कोंडाजी बागवान
रा. ६०२, अमरान रेसिडेन्सी, अक्कलकोट रोड, मल्लिकार्जुन नगर, सोलापूर ४१३००४
मो. ९९२२८८५००६, ९६६५२६४६५६

जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकतीच्या संदर्भात खालील मूळ दस्त गहाळ झाले आहेत आणि त्यासंबंधी गहाळ तक्रार अर्ज संबंधित पोलिस स्टेशनला दि. १९/१०/२०२६ रोजी दाखल केला आहे.

उपनिबंधक सोलापूर उत्तर-१ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत मूळ बक्षीसपत्र दिनांक : ०९/१०/२०१७, रोजी अ.क्र. ५३२७/२०१७ वरील, मूळ नोंदणी पावती आणि सूची क्र.२.

आमच्याकडे उपलब्ध असलेल्या या दस्तऐवजांची प्रमाणितप्रत, गहाळ तक्रारी दाखल्याची प्रत आणि ही जाहीर सूचना, हे दुय्यम पुरावा म्हणून गृहीत धरून ती मूळ मालकी दस्त म्हणून स्वीकारली जातील. तसेच परिशिष्टात नमूद मिळकत श्री. सतीश तानाजी काटे यांच्या मालकीची आहे आणि सध्या परिशिष्टात नमूद मिळकती त्यांनी कोणत्याही बँकेकडे गहाण ठेवलेली नाही आणि श्री. सतीश तानाजी काटे, ती मिळकत उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., कडे गहाण ठेवणार आहेत. खाली दिलेल्या परिशिष्टात नमूद मिळकतीबद्दल कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास, ही नोटीस प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून ०७ दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या कार्यालयाच्या पत्यावर आपले आक्षेप लेखी स्वरूपात कळवावेत.

परिशिष्ट

जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, पैकी मौजे बाळे, येथील सर्व्हे क्र.७९/१/ब, पैकी प्लॉट क्र.४, यासी क्षेत्र ८४ चौ. मी., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिध्द केली दि. १९/१०/२०२६

सही/-
ॲड. गणेश वसंत कटारे
बी.कॉम. एल.एल.बी.(स्पे.)
ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)
बी.ए. एल.एल.बी.
कार्यालय क्र. ११, पहिला मजला, स्क्रेअर-वन कॉम्प्लेक्स, १३१, सिध्देश्वर पेठ, सोलापूर-०३
मोबाइल क्र. ९८६०११००११

PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS COURT OSMANABAD

IN THE COURT OF Aparna Nitin Navandar
Adhoc Dist. Judge -1 Asst.Sessions Judge, Osmanabad,, Osmanabad.

NOTICE / SUMMONS IN MOTOR ACCIDENT CLAIM PETITION

M.A.C.P./39/2026
Chhaya Anand Garad Vs
Turtle Infratrade Pvt. Ltd.
25-11-2026 Exh. 13

To,
Turtle Infratrade Pvt. Ltd.
R/o Subhash Nagar, Kondi,
Tq. North Solapur, Dist. Solapur.

Whereas has instituted a Motor Accident Claim Petition impleading you as one of the respondents, which case has been directed to be listed before this Tribunal/Court for hearing at 10.00 am. On 25/11/2026.

Now therefore you are given notice to appear in this Tribunal/Court in person or by a pleader duly instructed (and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some person, able to answer all such questions), on the 25/11/2026 at 11:00 o'clock in the forenoon, to answer the claim; and and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 14/10/2026

Court Stamp

sd/-
Adhoc Dist. Judge -1
Asst.Sessions Judge,
Osmanabad

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६

क्राईम वृत्त...

'ओव्हरटेक'च्या कारणावरुन १० हजार रुपये घेतले काढून

सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

गाडीला ओव्हरटेक केल्याच्या कारणावरुन पाठीमागून कारमधून आलेल्या तीन ते चार अज्ञात इसमांनी लातूरच्या एका वाहनचालकास बेदम मारहाण करत त्याच्या खिशातून दहा हजार रुपये बळजोरीने काढून घेतल्याची घटना रविवार १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास तुळजापूर रोडवरील चव्हाण शोरुमसमोर घडली. याप्रकरणी करीम रोहित शेख (वय-३८, रा.शिवाजी नगर, जि.लातूर) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी व त्यांचे एम.एच.२४ एफ.३६३६ या क्रमांकाच्या चारचाकी वाहनातून लातूरहून सांगलीकडे निघाले होते. यादरम्यान पाठीमागून आलेल्या एम.एच.१३ एफ.सी.४३८९ या क्रमांकाच्या चारचाकी वाहनातून आलेल्या अज्ञात इसमांनी ओव्हरटेकवरुन वाद घालून फिर्यादीस शिवीगाळ व कंबरेच्या बेल्टने, कड्याने मारहाण केली. फिर्यादीच्या खिशातील १० हजार रुपये काढून घेतले.

जुन्या भांडणातून तरुणावर वार; तिघांविरुध्द गुन्हा

सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

होम मैदान परिसरात झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरुन एका तरुणावर लोखंडी हत्याराने व चाकुने वार करुन गंभीर जखमी केल्याची घटना पानगल हायस्कूलजवळ घडली. याबाबत अरबाज मोहम्मद हुसेन हतुरे (वय-१९, रा.बेगम पेठ) याने सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादीचे भाऊ अबुझर हे पूर्वी होम मैदानावर झालेले भांडण मिटवण्यासाठी पानगल शाळेसमोर गेले असता, आरोपी सैफन शेख, आदिलशा गुड्डापुरे आणि आहाद तांबोळी (सर्वजण रा.सोलापूर) यांनी शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिली. लाथाबुक्क्यांनी मारहाण करत लोखंडी हत्याराने व चाकुने खांद्यावर व गळ्याजवळ वार करुन जखमी केले, असे फिर्यादीत नमूद आहे.

टँकरच्या धडकेत छोटा हत्ती वाहनातील दोघेजण जखमी

सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

भरधाव टँकरने पाठीमागून धडक दिल्याने छोटा हत्ती वाहनातील दोघेजण जखमी झाल्याची घटना मोहोळ-लांबोटी रस्त्यावर घडली. सचिन मळसिध्द बंडगर (वय-४२), हर्षराज रामजल यादव (वय-२७, दोघेही रा.मोहोळ) अशी जखमींची नावे आहेत. ते दोघे सोमवार, दि.१९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास छोटा हत्ती वाहनात बसून लांबोटीकडे निघाले असताना पाठीमागून येणाऱ्या टँकर वाहनाने त्यांना धडक मारली. यात दोघे मार लागून जखमी झाल्याने त्यांना मोहोळ येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात सविता वाघमोडे यांनी दाखल केले.

शिवीगाळ करण्याच्या कारणावरुन पती-पत्नीला मारहाण

सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

शिवीगाळ का करतो म्हणून विचारल्याच्या कारणावरुन एका पती-पत्नीला दगड व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना ७० फूड रोड येथील भारतरत्न इंदिरा नगरात घडली. लक्ष्मण यल्लप्पा मस्के (वय-३३), अंबिका लक्ष्मण मस्के (वय-३०, दोघेही रा.भारतरत्न इंदिरानगर, सोलापूर) असे मारहाण झालेल्या पती-पत्नीचे नाव आहे. सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे घराजवळ असताना दीपक मीनगुले व राधा मीनगुले यांनी मारहाण केली. यात मस्के पती-पत्नीच्या सर्व अंगाला मुका मार लागल्याने ते दोघे स्वतः उपचारासाठी येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये दाखल झाले.

ट्रकची ऑटोरिक्षाला धडक; सहा प्रवासी झाले जखमी

सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

भरधाव असलेल्या ट्रकने ऑटोरिक्षाला पाठीमागून धडक दिल्याने ऑटोरिक्षामधील सहा प्रवासी जखमी झाल्याची घटना तुळजापूर नाका जवळील सर्विस रोडवर घडली. बालया सिद्राम पुला (वय-३७), लक्षिता नागय्या पुला (वय-१६), लक्ष्मी बालाजी वल्लाकाटी (वय-४१), रेणुका राजू कदम (वय-५२), संध्या राजू गड्डम (वय-२१), पुष्पा प्रभाकर कनकुंटला (वय-४५, सर्वजण रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) असे जखमींची नावे आहेत. हे सर्वजण रविवार, दि.१८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास श्रीक्षेत्र मार्डी येथून जुना विडी घरकुलच्या दिशेने ऑटोरिक्षाद्वारे निघाले होते. जुना तुळजापूर नाका जवळील रघोजी ट्रान्सपोर्ट जवळ पाठीमागून येणाऱ्या ट्रकने त्यांना धडक मारली. जखमींना येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

गाडी का घेतला असे विचारल्याने तरुणाला लाथाबुक्क्याने मारहाण

सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

माझी गाडी का घेतला म्हणून विचारणा करणाऱ्या तरुणाला पाच जणांनी मिळून लाकडांनी व लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मौलाली चौक येथील कुंभार गल्ली येथे सोमवार, दि.१९ ऑक्टोबर २०२६ रोजी घडली. दीपक राजेश अनगले (वय-२५, रा.मौलाली चौक, सोलापूर) मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. लक्ष्मण मस्के, अंबिका मस्के आणि इतर तीन जणांनी मिळून ही मारहाण केली. त्यात पायाला जखम, सर्व अंगाला मुका मार लागल्याने उपचारासाठी बहीण सोनाली हिने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

पेटलेला फटाका तोंडाजवळ फुटल्याने युवक जखमी

सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

फटाके उडवताना पेटलेला फटाका तोंडाजवळ फुटल्याने १७ वर्षीय युवक भाजून जखमी झाला. ही घटना लष्कर परिसरातील कुंभार गल्लीत आज सोमवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास घडली. जय प्रकाश कमुरले (वय १७ रा.उत्तर सदर बाजार, सोलापूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे . आज सोमवारी पहाटेच्या सुमारास तो कुंभार गल्लीत फटाके उडवत होता. त्यावेळी अचानक फटाका तोंडाजवळ फुटल्याने तोंड आणि डोळ्याजवळ भाजून तो जखमी झाला. त्याला अथर्व (मित्र) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.याची नोंद सदर बझार पोलीसात झाली आहे.


दुष्काळाचे पंचनामे पाठवण्याला 'बुधवार'चा मुहुर्त

समस्या निवारण्यासाठी वॉर रूम्सची निर्मिती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ ऑक्टोबर-

जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पाणी व चारा टंचाईवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी जिल्हा प्रशासनातील सर्वच अधिकारी कामाला लागले आहे. खरिपातील नुकसानीचे पंचनामेही आता पूर्ण झाले असून, हे पंचनाम्याचे अहवाल बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळपर्यंत शासनाकडे पाठविणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज (दि. १९) दिली. दरम्यान, जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या दुष्काळाबाबतच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी ४ वॉर रूम्सची निर्मिती करणार असल्याची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

उजनी धरणाव्यतिरिक्त कोणत्याही मध्यम, साठवण तलावाच्या कार्यक्षेत्रात एकही मोठा पाऊस झाला नसल्याने यंदाची दुष्काळी स्थिती अतिशय गंभीर आहे. जिल्ह्यात सरासरीच्या तुलनेत अवघा ५० टक्केच पाऊस पडल्याने खरिपातील सर्वच पिके वाया गेली आहेत. आता रब्बी हंगामातही पाऊस पडण्याची शक्यता कमी असल्याने आहे त्या उजनीच्या पाण्यातून अगदी सुक्ष्म नियोजन करण्याची गरज आहे. उजनी धरणात उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर प्राधान्याने पिण्यासाठी करून ऑगस्ट २०२७ अखेरपर्यंत पुरेल अशा पद्धतीने पाण्याचे काटेकोर नियोजन आम्ही



केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी महानगरपालिका, नगरपालिका आणि पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व संस्थांना नियमित पाणी वापरात १० टक्के कपात करण्याच्या सुचना दिल्या आहेत. दुष्काळाची परिस्थिती गंभीर असल्याने प्रत्येक व्यक्तीला पिण्याचे पाणी आणि जनावरांना चारा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. या परिस्थितीत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. पाणीटँकरचे नियोजनही लावले आहे. मागेल त्या गावाला अवघ्या ४८ तासात पाणीटँकर देण्याचे नियोजन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. इतकेच नव्हेतर जिल्ह्यातील नागरिकांची तहान भागविण्यासाठी कितीही पाणीटँकर लागले तरी ते देण्यास प्रशासन सज्ज असल्याचीही माहिती शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

पंचनाम्याची पडताळणी सुरू

जिल्ह्यात खरिपातील पिकांच्या झालेल्या नुकसानीचे अबकड पध्दतीने सर्व प्रकारचे पंचनामे पूर्ण झाले असून, जिराईत, बागायत, फळपिके आदी सर्व प्रकारचे पंचनामे झाल्याची अंतिम पडताळणी २ दिवसांत पूर्ण होवून हे पंचनामे बुधवारी शासनाकडे वर्ग करण्यात येणार आहेत.

मायक्रोफायनान्सने सक्तीची वसुली केल्यास कारवाई

मायक्रोफायनान्सची सोमवारी बैठक घेवून सक्तीची वसुली करू नये अशा सुचना दिल्या आहेत. जिल्ह्यातील बँकांनाही याबाबत कळविले आहे. इतकेच नाहीतर दुष्काळात सावकारी करणाऱ्यांना चाप लागणार आहे. या काळात कोणी सावकारी केली तर त्यांच्यावरही फौजदारी गुन्हे दाखल करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिला आहे.

जिल्हा प्रशासनाकडून विविध कामांना प्राधान्य

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी मृद व जलसंधारणाची अधिकाधिक कामे हाती घेणार आहोत. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून जलसंवर्धनाच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देणार आहोत. सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी प्रोत्साहन देणार आहोत. जिल्हा परिषदेमार्फत वित्त आयोगाच्या निधीतूनही जलसंधारणाची कामे प्रस्तावित करून ती निर्धारित वेळेत पूर्ण करणार आहोत. जिल्ह्यात कुठेही पाण्याचा अपव्यय होणार नाही, यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. जिल्ह्यात सध्या सुमारे दीड महिना पुरेल एवढाच चारा उपलब्ध असल्याने आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. जिल्ह्याबाहेर चारा नेण्यावर घातलेल्या निर्बंधांची नियमित तपासणी सुरू आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून यापूर्वी उपलब्ध करून दिलेल्या दोन कोटी आणि त्यानंतरच्या तीन कोटी रुपयांच्या निधीतून चारा प्रत्यक्ष उपलब्ध करण्यात येणार आहे. भविष्यात चारा डेपो किंवा चारा छावण्या सुरू करण्याची वेळ आल्यास त्यासाठी आतापासूनच काटेकोर नियोजन सुरू असल्याचीही माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

मोगले साडी सेंटर चोरीप्रकरणी आरोपीला अटींसह जामीन मंजूर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

सोलापुरातील प्रसिद्ध मोगले साडी सेंटर येथे झालेल्या १० लाख ७० हजार रुपयांच्या चोरीप्रकरणातील आरोपीला मा.वी एम रेडकर या न्यायालयाने अटींसह जामीन मंजूर केला आहे.



फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीनुसार, मोगले साडी सेंटरमधील कॅश काउंटरम धील ७० हजार रुपये व तिजोरीतील १० लाख रुपये, अशी एकूण १० लाख ७० हजार रुपयांची रोकड चोरीस गेली होती. या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी तामिळनाडू येथून अटक केली होती. त्यानंतर न्यायालयाने आरोपीला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती.

त्यानंतर आरोपीतर्फे न्यायालयात जामीन अर्ज दाखल करण्यात आला. सदर अर्जावर आरोपीतर्फे ॲड. प्रणव उपाध्ये यांनी युक्तिवाद केला. तसेच सरकारी पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला प्रत्येक सोमवारी दुपारी १२ ते १ या वेळेत जोडभावी पोलीस ठाण्यात हजेरी लावण्याच्या अटीवर जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड.प्रणव उपाध्ये व ॲड.भागवत इंदापूरकर काम पाहिले.

दुष्काळ अन् आचारसंहितेत अडकले 'झेडपी'चे प्रस्ताव; सदस्यांची झाली कोंडी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर-

चार वर्षांच्या प्रशासकराजानंतर जिल्हा परिषदेची सूत्रे लोकप्रतिनिधींच्या हाती आली; मात्र सहा महिने उलटूनही ग्रामीण भागातील विकासकामांना अपेक्षित गती मिळालेली नाही. त्यातच जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती मुळे निधीच्या वापराचा प्राधान्यक्रम बदलण्यात आल्याने झेडपी सदस्यांमध्ये नाराजी पसरली आहे. गावागावातील रस्ते, मूलभूत सुविधा आणि अन्य विकासकामांना ब्रेक लागण्याने केवळ जलसंधारणाच्या कामांना मात्र ग्रीन सिग्नल देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद सदस्यांनी प्रस्तावित केलेल्या कामांचे भवितव्य अनिश्चित बनले आहे.



जिल्हा परिषद सेस फंड, वित्त आयोग आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून विविध कामांचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. मात्र, प्रशासकीय मान्यता आणि निधी वितरणाच्या प्रक्रियेत कामे अडकली आहेत. जिल्ह्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढत असताना उपलब्ध निधीतून दुष्काळ निवारण आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले आहेत. त्यामुळे रस्ते, अन्य पायाभूत सुविधा आणि स्थानिक विकासकाम ांसाठी प्रस्तावित निधीला विलंब होऊ शकतो. आधीच मंजुरीच्या प्रतीक्षेत असलेल्या कामांवर प्राधान्यक्रमातील बदलाचा परिणाम झाला आहे.

दुष्काळ निवारण्यासह इतर उपाययोजनासाठी डी.पी.सी.चा निधी वळवण्यात आला आहे. ३० टक्के निधी या दुष्काळ निवारण्यासाठी वापरण्यासंबंधीचे आदेश विभागीय स्तरावर प्राप्त झाल्याने त्यानुसार खर्च करण्यात येईल, अशी माहिती सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी याबाबत बोलताना सांगितले.

माता रमाईंच्या पुतळा स्थापनेचे काम अंतिम टप्प्यात

उर्वरित विकासकामे डीपीसी निधीतून पूर्ण करावी : चंदनशिवे

भीमसैनिकांच्या पाठपुराव्याला यश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर,दि.१९ ऑक्टोबर-

सोलापूर महानगरपालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळा स्थापनेच्या कामाला गती मिळाली असून हे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. शनिवारी सकाळी आठ वाजता महापालिकेच्या



संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुतळा स्थापनेच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे , नगरसेवक गौतम कसबे, कामगार नेते अशोक जानराव, सर्पमित्र दीपक इंगळे, चंद्रकांत सोनवणे, सुमन लोंढे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यागमूर्ती म ाता रमाई यांच्या विचारांचा व त्यागाचा वारसा जपणारे हे उद्यान सोलापूरच्या सामाजिक आणि ऐतिहासिक वैभवात महत्त्वाची भर घालणारे ठरणार आहे.

दरम्यान, उद्यानातील उर्वरित विकासकामे अपूर्ण न ठेवता ती जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीतून तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी केली.

माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळा स्थापनेसाठी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि भीमसैनिकांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. या प्रयत्नांना यश मिळत असल्याने आंबेडकरी अनुयायांसह उपस्थितांनी सम ाधान व्यक्त केले.

पाणी भरण्यावरुन तलवारीने मारहाण

सोलापूर, दि. १९ ऑक्टोबर-

पाणी भरण्याच्या किरकोळ भांडणातून दोन गटात तलवार, लोखंडी गज, लाथाबुक्या आणि बांबूने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला.ही घटना मि लिंदनगर बुधवार पेठ येथील ११ नंबर शाळेजवळ आज सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. संदीप अंबादास कापुरे (वय ३० रा.मिलिंद नगर)असे जखमीचे नाव आहे.पाणी भरण्याच्या कारणावरून त्याला अमोल सावंत,अविश सावंत आणि इतर दोघांनी मिळून मारहाण केली.तर दुसऱ्या गटातील अजित सिद्राम सावंत (वय ५५ रा.मिलिंद नगर) हे जखमी झाले.त्यांना त्याच कारणावरून धना कापुरे,भैय्या कापुरे आणि अन्य दोघांनी मिळून लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली.जखमीना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पंढरपूर येथे कोयत्याने मारहाण; तरुण जखमी

पूर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरुन कोयता आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. संकेत पुरुषोत्तम बारस्कर (वय-२१, रा.पंढरपूर) असे जखमीचे नाव आहे. रविवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास राज व्यवहारे, पवन जैन आणि इतर चौघांनी मिळून मारहाण केली. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

निसर्गाचे रक्षण करून विजयादशमी साजरी करुया

तभा वृत्तसेवा,
सोलापूर,दि.१९ ऑक्टोबर-

विजयादशमी अर्थात दसरा हा सण विजय, आनंद, समृद्धी आणि निसर्गाशी नाते जपण्याचा संदेश देणारा सण आहे. या दिवशी आपट्याची पाने 'सोने' म्हणून वाटण्याची परंपरा आपल्याकडे प्रचलित आहे. मात्र, या परंपरेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर आपट्यासोबतच अंजन आणि कांचन झाडांच्या फांद्या तोडल्या जातात. त्यामुळे निसर्गाची हानी होते आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या वृक्षांना नुकसान पोहोचते.



आपटा, अंजन आणि कांचन ही झाडे एकाच वनस्पती कुळातील असल्याने त्यांची पाने दिसायला जुळी वाटतात. याचाच फायदा घेऊन विक्रेते विजयादशमी दसऱ्याच्या दिवशी अंजन किंवा कांचनची पाने संबंधित झाडाच्या फांद्या तोडून आपल्याला आपट्याची पाने म्हणून विक्री करतात. या पार्श्वभूमीवर वाईल्डलाईफ काँझर्वेशन असोसिएशन, सोलापूर आणि भकालो नर्सरी यांच्याकडून ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर परिसरातील कांचन झाडे तोडली जाऊ नयेत याकरिता जनजागृतीपर फलक लावण्यात आले आहेत. या झाडांच्या पर्यावरणीय महत्त्वाबद्दल जनजागृती करण्यात येत आहे. यावेळी अजित चौहान, सोमशेखर पाटील आदी उपस्थित होते.

मैंदर्गी प्राथमिक आरोग्य केंद्राची जिल्हास्तरीय पथकाकडून तपासणी; त्रुटी दूर करण्याचे निर्देश

आरोग्यसेवेचा दर्जा उंचावण्यावर भर

रखडलेल्या नवीन इमारतीच्या कामाचा आढावा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ ऑक्टोबर

प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रशासकीय कामकाज, आरोग्य सुविधांची उपलब्धता आणि विविध आरोग्यविषयक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयुक्त आरोग्यसेवा यांच्या आदेशानुसार मैंदर्गी (ता. अक्कलकोट) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची जिल्हास्तरीय पथकाने तपासणी केली. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश कोपरवाड आणि डॉ. अश्फाक सय्यद यांच्या उपस्थितीत झालेल्या या पाहणीदरम्यान आरोग्य केंद्राच्या कामकाजातील त्रुटी दूर करून सेवा अधिक प्रभावी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

या भेटीदरम्यान जिल्हास्तरीय पथकाने



प्राथमिक आरोग्य केंद्रातील कार्यालयीन काम काज, परिसराची स्थिती आणि आरोग्यसेवेशी संबंधित विविध बाबींची पाहणी केली. ऑक्टोबर महिन्यात राबविण्यात येत असलेल्या आरोग्यविषयक कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेऊन त्यांच्या अंमलबजावणीची माहिती जाणून घेण्यात आली. तपासणीदरम्यान काही त्रुटी निदर्शनास आल्याने कामकाजात आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेत आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे महत्त्वाचे असल्याने आरोग्य केंद्रातील दैनंदिन कामकाज, नियोजित आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि उपलब्ध सुविधांचा प्रभावी वापर याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे सांगण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. मंजुनाथ पाटील, डॉ. महांतेश खानापुरे यांच्यासह आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिका, आरोग्यसेवक, आशा गटप्रवर्तक, परिचर, वाहनचालक आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

नवीन इमारतीच्या रखडलेल्या कामाबाबत विचारणा

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचा प्रश्नही या भेटीदरम्यान उपस्थित झाला. रखडलेल्या बांधकामाबाबत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी संबंधित अभियंत्यांकडे विचारणा करून आवश्यक सूचना दिल्या. नवीन इमारतीचे काम वेळेत पूर्ण होणे आणि नागरिकांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध होणे या दृष्टीने या विषयाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

युवकास मारहाण केल्याचा व्हिडिओ समोर येताच लातूर पोलिसांकडून तात्काळ दखल

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : सोशल मीडियावर अल्पवयीन मुलासंदर्भातील व्हिडिओ व्हायरल झाल्याचे निदर्शनास येताच लातूर पोलिसांनी तात्काळ दखल घेत पीडित मुलाचा शोध घेऊन व्हिडिओतील चार आरोपी निष्पन्न केले आहेत. त्यापैकी एका आरोपीला अटक करण्यात आली असून, उर्वरित तीन आरोपींच्या शोधासाठी तीन पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

सदर घटना जून महिन्यातील असून, याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोक्सो, अपहरण, खंडणी, जिवे मारण्याचा प्रयत्न आदी गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल असून तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणात तातडीने कार्यवाही करण्यात आली आहे.

पीडित मुलगा अल्पवयीन असल्याने त्याची ओळख उघड होईल असा व्हिडिओ प्रसारित करणे टाळावे. असा व्हिडिओ कोणीही पुढे पाठवू नये किंवा सोशल मीडियावर व्हायरल करू नये. पीडित बालकाची ओळख व गोपनीयता जपण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागावे. पीडित अल्पवयीन बालकाची ओळख उघड करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे.

विविध वृत्त.....

शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग २० ऑक्टोबर रोजी बंद राहणार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ ऑक्टोबर : दसरा सणानिमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग मंगळवार, २० ऑक्टोबर २०२६ रोजी बंद राहील.

तसेच बुधवार, २१ ऑक्टोबर २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरुड यांनी कळविले आहे.

हेल्मेटअभावी २७ वर्षीय तरुणाचा अपघातात मृत्यू

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर न केल्यामुळे होणाऱ्या अपघातांमध्ये जीवितहानी होण्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. अशातच पहाटे लातूर-बार्शी रोडवरील रामेगाव फाट्याजवळ झालेल्या अपघातात २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. रामहरी बालाजी पाटील (वय २७ वर्षे, रा. गिरवलकर नगर, लातूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. हेल्मेटचा वापर केला असता,

तर डोक्याला झालेली गंभीर दुखापत टाळता येऊन त्याचे प्राण वाचण्याची शक्यता होती. या घटनेमुळे दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पहाटे सुमारे २.३० ते ३ वाजण्याच्या दरम्यान रामहरी बालाजी पाटील हे एमएच-२४-सीसी-३११८ क्रमांकाच्या प्रवास करत असताना लातूर-बार्शी रोडवरील रामेगाव फाट्याजवळ अपघात झाला. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. सदर घटना गातेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या घटनेचा अधिक तपास गातेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस करत आहेत.

'अमृत दुर्गोत्सव २०२६' उपक्रमात सहभागी व्हा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १६ : महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमी इतिहास, महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांचा समृद्ध वारसा आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याच्या उद्देशाने 'अमृत दुर्गोत्सव २०२६' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

दिवाळीच्या सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी ऐतिहासिक वारशाशी जोडले जावे, गड-किल्ल्यांचा इतिहास जाणून घ्यावा तसेच पुढील पिढीमध्ये इतिहासाविषयी अभिमान आणि संवर्धनाची भावना निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी, युवकांनी आणि नागरिकांनी आपल्या घरी, शाळेत किंवा परिसरात महाराष्ट्रातील ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार कराव्यात. प्रतिकृती तयार केल्यानंतर त्यांची छायाचित्रे काढून अमृत दुर्गोत्सवच्या अधिकृत वेबसाईटवर अपलोड करावीत.

उसाच्या शेतात गांजाची लागवड

४ लाख ३१ हजारांचा ८ किलो ६२० ग्रॅम गांजा जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : लातूर जिल्ह्यात अंमली पदार्थांची अवैध लागवड, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या अनुषंगाने शिरूर अनंतपाळ पोलिसांनी कारवाई करून उसाच्या शेतात लागवड केलेला गांजा जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ८ किलो ६२० ग्रॅम गांजा, अंदाजे ४ लाख ३१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८.२८ वाजण्याच्या सुमारास मौजे सांगवी - घुगी येथील शेत शिवारातील सर्वे क्रमांक १२ मधील मधुकर यांच्या उसाच्या शेतात गांजाची लागवड केल्याची बाब निदर्शनास आली. याप्रकरणी मनोज वय ३८ वर्षे, व्यवसाय शेती, रा. सांगवी-घुगी, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर. याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. सदर ठिकाणाहून गांजाची झाडे उपटून दोन पोत्यांमध्ये भरलेला एकूण ८ किलो ६२० ग्रॅम गांजा मिळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची अंदाजे किंमत ४ लाख ३१ हजार रुपये आहे. याप्रकरणी पोलीस स्टेशन शिरूर अनंतपाळ येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३३/२०२६, कलम ८ (क), २०(ब) (ळळ) (ब), एनडीपीएस अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याची फिर्याद परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी अक्षय जाधव यांनी दिली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रायबोळे करीत आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा प्रभारी अधिकारी अक्षय जाधव यांच्या नेतृत्वातील पथकाने केली आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

किल्लारीत तिर्रट जुगारावर पोलिसांचा छापा

३ लाख ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या अनुषंगाने औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या नेतृत्वाखाली औसा व किल्लारी पोलिसांच्या संयुक्त पथकाने किल्लारी येथे तिर्रट जुगारावर छापा टाकला. या कारवाईत जुगार खेळणारे व खेळविणारे एकूण १३ जण आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून रोख रक्कम, १५ मोबाईल फोन, तीन मोटारसायकली आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ३ लाख ४६ हजार २० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत किल्लारी शहराजवळील विरळ वस्तीतील एका पत्र्याच्या शेडमध्ये पैशांची बाजी लावून तिर्रट नावाचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली औसा व किल्लारी पोलीस ठाण्याच्या संयुक्त पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी दोन टेबलांवर जुगार खेळला जात असल्याचे आढळून आले.

या कारवाईत १२ प्रौढ व्यक्ती आणि एक विधिसंघर्षग्रस्त बालक असे एकूण १३ जण मिळून आले. पोलिसांनी त्यांच्याकडून ४६ हजार २० रुपये रोख रक्कम, १५ मोबाईल फोन, तीन मोटारसायकली तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले. या प्रकरणी किल्लारी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मरडे करीत आहेत.सदरची कारवाई औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांच्या नेतृत्वाखाली औसा व किल्लारी पोलीस ठाण्याच्या अधिकारी आणि अंमलदारांच्या संयुक्त पथकाने केली.लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांकडून कारवाई सुरू असून, अशा गैरकृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येत आहे.

कौटुंबिक दांडिया महोत्सवात ' डफी ' चित्रपटाच्या पोश्टरचे उत्साहपूर्ण वातावरणांत लोकार्पण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : चित्रपट सृष्टीत आपल्या परिश्रमाच्या बळावर स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यात कमालीचे यशस्वी ठरलेल्या निर्माता - दिग्दर्शक विशाल गिरी यांच्या आगामी मराठी चित्रपट ' डफी' चे पोश्टर लॉन्चिंग , लोकार्पण लातुरात नुकत्याच पार पडलेल्या कौटुंबिक दांडिया महोत्सवात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.यावेळी सिनेअभिनेते तानाजी गलगुंडे , भूषण मंजुळे, अभिनेत्री चैत्राली चव्हाण,अर्चना सूर्यवंशी यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



या चित्रपटाच्या पोश्टरच्या लॉन्चिंग सोहळ्यास चित्रपटातील सर्व प्रमुख कलाकारांनी आवर्जून उपस्थिती नोंदवली. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना अभिनेता तानाजी गलगुंडे यांनी ग्रामीण कथेवर आधारित असलेला एक कौटुंबिक चित्रपट असल्याचे मत व्यक्त केले. आजच्या रसिक प्रेक्षकांना हवा असलेला सर्व मनोरंजक मसालाही या चित्रपटात योग्य प्रमाणात उपयोगात आणलेला आहे. त्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रित बसून या चित्रपटाचा आनंद घेऊ शकतात. प्रत्येक कलाकाराने आपआपल्या वाट्याला आलेली भूमिका चोख आणि प्रामाणिकपणे निभावण्याची काम केले आहे, ही बाब चित्रपट पाहिल्यानंतर रसिकांच्या लक्षात येईल. निर्माता दिग्दर्शक विशाल गिरी यांच्यासोबत काम करताना आपल्याला अतिशय आनंद झाल्याचे तानाजी गलगुंडे यांनी बोलून दाखवले. अभिनेते भूषण मंजुळे यांनी यावेळी बोलताना एक वास्तववादी विषयावरील हा चित्रपट आहे. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांवर आधारित हा चित्रपट असल्याचे प्रेक्षकांना वाटणार असून याचित्रपटात आपण तानाजी गलगुंडे यांच्या वडिलांची भूमिका साकारली आहे. कौटुंबिक भट्टीतील चित्रपटांना प्रेक्षक प्राधान्याने पसंत करत असतात. त्यामुळे हा चित्रपट नक्कीच सर्व भाषिक प्रेक्षकांना आवडेल असा विश

्वासही मंजुळे यांनी व्यक्त केला. तसेच आपल्या मराठवाड्यातील ग्रामीण भागातही मराठी चित्रपटाची निर्मिती होऊ शकते, विशाल गिरी यांनी या माध्यमातून दाखवून दिल्याचे त्यांनी नमूद केले. अभिनेत्री चैत्राली चव्हाणने हा चित्रपट करताना आपल्याला दिग्दर्शक विशाल गिरी आणि सर्व सहकलाकारांकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्याचे सांगितले.

हा चित्रपट प्रा. भास्कर बडे यांच्या ' आंजीमाय ' या ग्रामीण कथेवर अवलंबून आहे. या कथेबद्दलची वास्तव पार्श्वभूमी प्रा. बडे यांनी यावेळी उलगडून सांगितली. चित्रपटाचे निर्माता दिग्दर्शक विशाल गिरी यांनी या चित्रपटाच्या निर्मितीमागची संकल्पना विशद केली. या चित्रपटाचे चित्रीकरण लातूर - बीड जिल्ह्यात अवघ्या चौदा दिवसात पूर्ण करण्यात आले. चित्रीकरणादरम्यान चित्रपटातील कलाकारांनी आपल्याला उत्तम प्रकारे सहकार्य केले. काही उणीव असतील तरीही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करून चित्रपट वेळेत पूर्ण व्हावा यासाठी सहकार्य केल्याचे गिरी म्हणाले. डफी चे चित्रीकरम बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील मांगेवाडी आणि परिसरात झाले आहे. काही चित्रीकरण लातूर तालुक्यातील खंडापूर येथेही कारण्यातआले. चित्रपटात लातूर जिल्ह्यातील अनेक नवोदित कलाकारांना संधी देण्यात आली आहे. आपण आपल्या चित्रपटात नवनवीन कलाकारांना संधी देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगून विशाल गिरी यांनी हा चित्रपट डिसेंबर महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे सांगितले.

लातूर ग्रामीणमध्ये बेकायदेशीर सुतळी बॉम्ब निर्मितीच्या ठिकाणी पोलिसांचा छापा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ ऑक्टोबर : लातूर ग्रामीण परिसरातील ममदापूर येथे शेतात सुरू असलेल्या बेकायदेशीर सुतळी बॉम्ब निर्मितीच्या ठिकाणी लातूर पोलिसांनी छापा टाकून मोठ्या प्रमाणात तयार सुतळी बॉम्ब, प्रक्रियेत असलेले बॉम्ब आणि निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले. ही कारवाई आज सोमवारी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. ममदापूर येथील चंद्रकांत धनवे यांच्या शेतातील रस्त्यालगत असलेल्या अंदाजे १५ बाय ५० फूट आकाराच्या पत्र्याच्या शेडमध्ये तसेच शेडलगतच्या मोकळ्या जागेत सुतळी बॉम्ब तयार करण्याचे काम सुरू असल्याचे पोलिसांना आढळून आले.



घटनास्थळी मोठ्या प्रमाणात तयार सुतळी बॉम्ब, प्रक्रियेत असलेले सुतळी बॉम्ब, सुतळी, कागद, सल्फर तसेच बॉम्ब निर्मितीसाठी वापरण्यात येणारे अन्य साहित्य आढळून आले. यावेळी सहा महिला कामगार आणि मुकादम लिंबराज गणपती मोरे (वय ४२, रा. ममदापूर, ता. लातूर ग्रामीण) उपस्थित होते. प्राथमिक चौकशीत या कारखान्याचा मालक म्हणून आसिफ रसूल शेख (वय ३२, रा. ताजुद्दिन बाबा दर्गा रोड, आंबेडकर चौक, लातूर) यांचे नाव समोर आले आहे. सुतळी बॉम्ब निर्मितीसाठी आवश्यक परवान्याबाबत चौकशी केली असता, संबंधितांकडे परवाना उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी आवश्यक परवान्यांची पडताळणी आणि संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू आहे.

स्फोटक पदार्थ हाताळण्यासाठी आवश्यक सुरक्षा व्यवस्था, संरक्षक साधने आणि कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना प्रथमदर्शनी अपुऱ्या असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तेथे काम करणाऱ्या कामगारांसह परिसरातील नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता होती. पोलिसांकडून घटनास्थळाचा पंचनामा, उपलब्ध साहित्याची मोजणी व जप्ती आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्यात येत आहे. स्फोटक पदार्थ अधिनियम, १८८४, स्फोटक पदार्थ नियम, २००८ तसेच तपासात निष्पन्न होणाऱ्या अन्य लागू कायदेशीर तरतुदींनुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र मायने (चाकूर) यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक रमेश चव्हाण (चाकूर पोलीस ठाणे), पोलीस उपनिरीक्षक व्यंकटेश कुलकर्णी (उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, चाकूर), पोलीस कर्मचारी लक्ष्मण अर्दवाड, गणेश वनामी तसेच महिला पोलीस कर्मचारी पूनम शेटे आणि रूपाली भोसले यांच्या पथकाने ही कारवाई केली. परवान्याशिवाय स्फोटक पदार्थ किंवा फटाक्यांची निर्मिती, साठवणूक अथवा हाताळणी होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या पोलीस ठाण्याला माहिती द्यावी. अशा धोकादायक आणि बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांची फसवणूक, निवडणूक आयोगाच्या मनमानी विरोधात कॉग्रेसचे आंदोलन

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १९ ऑक्टोबर : राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यात महायुती सरकारला आलेले अपयश, शेतकऱ्यांची झालेली फसवणूक आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कथित पक्षपाती व मनमानी कारभाराविरोधात लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने रविवारी निलंगा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार निदर्शने करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश सहप्रभारी रेहाना चिश्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानांतर्गत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सरकारच्या धोरणांविरोधात आवाज उठविला.



मराठवाड्यासह राज्यातील शेतकरी सध्या गंभीर दुष्काळी परिस्थितीचा सामना करीत आहेत. पावसाअभावी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. मात्र, राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना पाच हजाराची मदत जाहीर करुन शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. एकीकडे शेतकरी संकटात असताना दुसरीकडे लोकशाहीचा महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरही काँग्रेसने प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता टिकविणे आणि नागरिकांच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करणे आवश्यक असल्याचे सांगत निवडणूक आयोगाच्या कथित मनमानी कारभाराविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली. यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारला जाब विचारण्यासाठी आणि संविधानाने दिलेल्या लोकशाही अधिकारांच्या रक्षणासाठी काँग्रेसचा संघर्ष सुरूच राहणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात डॉ. स्मिताताई शहापूरकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, महिला जिल्हाध्यक्षा शिलाताई पाटील, डॉ अरविंद भातांब्रे, जिल्हा उपाध्यक्ष गंगासिंह कदम, मारोती पांडे, प्रभाकर बंडगर, सभापती फैजलखान कायमखानी, शाहीद पटेल, मानिक गायकवाड, नगरसेवक अजित नाईकवाडे, सुधीर लखनगावे, पं. स. सदस्य किरण पाटील, बालाजी आंधारे, तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, आंबादास जाधव, विलास कांबळे, प्रा. सुरेंद्र धुमाळ, अनिल अग्रवाल, विठ्ठल पाटील, दिनकर बिरादार, बालाजी गोमसाळे, विलास लोभे, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

जिल्हा काँग्रेसची आढावा बैठक संपन्न

सिद्धेश्वर मंगल कार्यालयात रेहाना चिश्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत एसआयआर, जिल्ह्यातील पक्ष संघटना, आगामी राजकीय वाटचाल, शेतकऱ्यांचे प्रश्न याबाबत आढावा घेण्यात आला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी खांद्याला खांदा लावून लढण्याचा निर्धार यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. पक्ष संघटना अधिक मजबूत करून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर आणि युवकांच्या प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठविण्याचा संकल्पही करण्यात आला.

संक्षिप्त...

राजमाता स्कूलमध्ये चिमुकल्यांचा उत्साह शिगेला



तभा वृत्तसेवा

शिरूरआनंतपाळ दि. १९ ऑक्टोबर : येथील पारंपरिक वेशभूषा, दांडियाचा ताल आणि चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद. अशा उत्साहपूर्ण वातावरणात शिरूर अनंतपाळ येथील राजमाता प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त दांडिया रास कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या नृत्यकौशल्याची सुंदर झलक सादर केली.

नवरात्रोत्सवातील सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी आकर्षक आणि रंगीबेरंगी पारंपरिक पोशाख परिधान केले होते. संगीताच्या तालावर हातातील दांडिया फिरवत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमात चैतन्य निर्माण केले. चिमुकल्यांचा उत्साह, त्यांचे सुंदर सादरीकरण आणि नृत्यातील समन्वय यामुळे उपस्थितांचे लक्ष वेधले गेले

शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सण-उत्सवांचे महत्त्व समजावे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा आणि कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, या हेतूने शाळेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शालेय जीवनात अशा सांस्कृतिक उपक्रमांना महत्त्वाचे स्थान असून, त्यातून विद्यार्थ्यांना स्वतःमधील कलागुण सादर करण्याची संधी मिळते.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे संचालक देवकुमार घोरपडे, संचालक आकाश चाकोते तसेच शिक्षिका धुमाळे मॅडम, चाकोते मॅडम आणि मोरे मॅडम यांनी नियोजन व आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

'अनुलोम'च्या बैठकीत ग्रामीण विकासावर मंथन गाळयुक्त शिवार अभियानासह सामाजिक उपक्रमांच्या नियोजनावर चर्चा



तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १९ ऑक्टोबर : अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) संस्थेच्या वतीने देवणी येथे अनुलोम मित्रांची बैठक झाली. या बैठकीत संस्थेच्या सामाजिक उपक्रमांचा आढावा घेण्यासह गाळयुक्त शिवार अभियान, शासकीय योजनांची जनजागृती आणि ग्रामीण विकासाच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीस अनुलोमचे निलंगा भाग जनसेवक अमोल भोसले यांच्यासह देवणी तालुक्यातील अनुलोम मित्र उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करणे आणि लोकसहभागातून विकासकामांना चालना देण्याबाबत यावेळी विचारविनिमय करण्यात आला.

गाळयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जलसंधारणाच्या कामांना प्रोत्साहन देणे, तसेच आगामी काळात सामाजिक उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण विकासासाठी समन्वयाने कार्य करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.या बैठकीस ज्ञानेश्वर शिंदे, ज्ञानेश्वर सगर, राम पटवारी, राजकुमार रोटे, माधव जाधव, सतीश कांबळे, अभंग सूर्यवंशी, निवृत्ती कारभारी, श्याम गगनबोने, किशोर बिरादार, जयद्रथ सह्याद्री, सुनील पाटील यांच्यासह अन्य अनुलोम मित्र उपस्थित होते.

आई बाबा फाउंडेशनच्या वतीने मोफत पाणपोई

तभा वृत्तसेवा

किनगाव दि.१७ ऑक्टोबर : येथील बस स्थानकातील प्रवाशांसह चालक व वाहनधारकांचे पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय होत असल्याने येथील आई-बाबा फाउंडेशन च्या वतीने मोफत पाणपोई चालू करण्यात आली आहे. सध्या अशा भीषण काळात पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने किनगाव बस स्थानकात पानपोळी चालू केल्यामुळे प्रवाशांनी आई-बाबा फाउंडेशनचे आभार मानले आहेत.

या पानपोईचे उद्घाटन सेवानिवृत्त पोलीस सिद्धेश्वर मुरकुटे व चेअरमन संग्राम चामे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आई-बाबा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आदित्य चिकटे, कृष्णा यमते , विनायक दळवी, वाहतूक नियंत्रक कपिल रब्बेवार, महेश फड, मुबारक पठाण, याकूब मोमीन, जरीना शेख , मनीषा राठोड , ग्रामस्थ व प्रवासी उपस्थित होते.

गाड्या धुण्याचा नाही तर शस्त्र पूजनाचा सण विजयादशमी : व्यंकट दशरथ

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ ऑक्टोबर : आपण आपली परंपरा विसरत चाललो आहोत विजया दशमी हा उत्सव शस्त्र पूजनाचा आहे . गाडी धुणे सजविण्याचा नाही . आपल्या सर्व देवता या शस्त्र सज्ज आहेत . आपल्याला शक्य असेल त्या शस्त्राची पूजा करून विजयादशमी सण साजरा केला पाहिजे , यामुळे प्रत्येक शाखेवर त्या त्या भागातील नागरिकांना एकत्रित करून शस्त्र पूजन करावे असे लातूर विभाग कार्यवाह व्यंकट दशरथ यांनी सांगितले .

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ छत्रपती संभाजी महाराज नगर उदगीर मार्फत लाल बहादूर शास्त्री विद्यालयात (ता.१७) शनिवारी आयोजित शस्त्र पूजन कार्यक्रम घेण्यात आला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहर संघचालक लक्ष्मीकांत रायेवार तर प्रमुख पाहुणे म्हणून दशरथ हे होते .

पुढे बोलताना दशरथ यांनी सांगितले की साधारण ३० वर्षापूर्वी पिठाची गिरणी बंद पाडण्याचे आंतर्राष्ट्रीय कारस्थान घडले होते . यासाठी अधिकारी आणि काही खासदारांना हाताला धरून नियम आणण्यात येत होता की गहू , ज्वारी , डाळी साठी वेगवेगळी गिरणी असली पाहिजे , यामुळे प्रत्येकाला ४/५ वेगवेगळ्या गिरण्या ठेवणे शक्य नसल्याने पिठाच्या गिरणी बंद पडतील आणि या कंपन्याचे रेडीमेड पीठ विकले जाईल .. या नियमा मागे असलेल्या अधिकारी , खाजदार यांची माहिती घेतली गेली आणि हा नियम सर्वोच्च न्यायालयाच्या मदतीने रद्द करण्यात आला होता . आता पुन्हा आंतरराष्ट्रीय कारस्थानाची सुरुवात झाली आहे फक्त आता ते वेगळ्या रूपात असे कारस्थान करीत आहेत ते ओळखले गेले पाहिजे असे सांगितले .

ग्रामीण भागात मंडळ स्थापन करून गावातील एक टक्के तर शहरातील तीन टक्के स्वयंसेवक तयार करणे लक्ष असल्याचे सांगितले . उदगीर शहरात ४० वसती शाखा सुरू करण्यात आल्या आहेत असेही त्यांनी सांगितले .

चिन्मय बांसवाडकर यांनी वयक्तिक पद्य तर चेतन पाटील यांनी सामूहिक पद्य म्हटले . संघाच्या पार्थने नंतर कार्यक्रमाची सांगता झाली . यावेळी कृष्णा बोयेनवाड, यशवंत बारस्कर , अमोल निडवदे ,रमाकांत चटनाळे , अमोल अंनकळे, दिनेश देशमुख , एकनाथ राऊत , प्रा.भंडे ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील यांच्यासह स्वयंसेवक हजर होते .

लाखाच्या दुखण्याला पाच हजाराचे अग्रीम मलम....?

दुष्काळाचे दिवाळीवर आर्थिक संकट

सुधीर गंगणे
तभा वृत्तसेवा

ओसा दि. १९ ऑक्टोबर : सलग दोन वर्षांतील अतिवृष्टीच्या नुकसानी नंतर यावर्षीच्या खरिप हंगामात अल निनोच्या संकटाने राज्य व केंद्र सरकारला थेट बांधावर येण्यास भाग पाडले. या दरम्यान सरकारने दुष्काळ जाहीर करून भरीव मदत करण्याचे आश्वासन देत नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे केले.यावेळी या भीषण नैसर्गिक संकटातून बाहेर पडण्यासाठी एकरी एक लाख रूपयांची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने अनेक संघटनांनी निवेदनाच्या माध्यमातून केली. तर सरकारने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिवाळी सण साजरा करता यावा.म्हणुन पाच हजार रूपयांची मदत जाहीर केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या एक लाख रूपयांच्या मागणीच्या दुखण्याला पाच हजार रूपयांचे अग्रीम मलम....? अशी चर्चा होताना दिसत आहे.



गेल्या दोन वर्षांपासून अतिवृष्टीने खरिप हंगामातील पिकांचे ऐण काढणी दरम्यान नुकसान होऊन उत्पादनात घट झाली होती. निसर्गाच्या या अवकृपेत सापडलेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामात या अतिरिक्त पावसाचा फारसा फायदा झाला नाही. सततच्या नैसर्गिक दुष्टचक्रात गेल्या सात आठ वर्षापासून खाजगी व बँकाच्या थकित कर्जात या दोन वर्षांच्या नुकसानीची अधिकची भर पडली.यामुळे यंदा खरिप हंगामातील पेरणी कशी करावी. याची मोठी चिंता शेतकऱ्यांना होती.अशा नैसर्गिक संकटाच्या फेऱ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी राज्य सरकारने गेल्या खरीप हंगामात पीक विमा १७ हजार ५०० रूपये हेक्टरी देणार असल्याचे जाहीर केले होते. आणि विमा मिळेल. अशी भर या काळातील बातम्यांनी टाकली. विमा मिळणारच या आशेने शेतकऱ्यांनी पीक विम्याच्या वायद्यावर पेरणीसाठी जुळवाजुळव करीत नव्याने कर्ज घेतले.या कर्जाच्या वाढत्या बोज्याच्या ओझ्याखाली सातबारा उर्ताऱ्याची मान यंदा चांगलीच अडकली.

या वाढलेल्या कर्जाचा भार कमी करण्यासाठी शेतकरी पहिल्या नक्षत्रातील मोसमी पावसाची वाट पाहत असतानाच जुन महिन्यात पावसाचे आगमन झाले. अल निनो च्या चर्चेनंतर पाऊस होत असल्याने शेतकऱ्यांनी पुढील पावसाच्या आशेवर औसा तालुक्यातील शेतकऱ्यांनी तूर ६ हजार ७९०, उडीद ७४५, मुग६५४ तर वर्षांतील नगदी पीक सोयाबीनची ९२ हजार ६१६ हेक्टर अशी खरीप हंगामात १ लाख १ हजार ७०६ हेक्टरावर पेरणी केली.पेरणीनंतर अपेक्षेप्रमाणे पाऊस पडला नसला तरी पिके हिरवीगार राहतील एवढा जेमतेम पडला. यामध्ये कोणत्या मंडळात कमी तर कोणत्या मंडळात अधिक झाला खरा. पण पिकांना याचा फारसा फायदा झाला नाही.पाऊस पडेल या आशेवर शेतकऱ्यांनी फवारणी,कोळपणी,खुरपणी अशी हंगामातील सर्व आंतरमशागतीची कामे केली. परंतू ज्या अपेक्षेने पेरणी केली. त्या अपेक्षेप्रमाणे पिकांच्या झाडाला लागण दिसत नव्हती. आणि यात पुन्हा एकदा पावसाने महिनाभराहून अधिकची उघाडीप दिली.

पावसाच्या उघाडीपीत उडीद,मुग हातातून कधीं निसटले हे शेतकऱ्यांना कळलेच नाही. यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीनकडे आपला मोर्चा वळवला.पाऊस नसल्याने उपलब्ध पाणी देऊन उत्पादन मिळविण्याचा केविलवाणा प्रयत्न रखरखत्या उन्हाने हाणून पाडला. जिथं १२ते १५ क्विंटलचे उत्पादन होत होते. तिथं १०० किलोचे उत्पादन होईना.यंदाच्या हंगामात पाऊस कमी आणि रखरखते ऊन जास्त असल्याने विहीरीनी तळ गाठला. तर ४००-५०० फुटातील विंधन विहिरीनी उचक्या देण्यास सुरुवात केली. यामध्ये अनेक पाणी साठे कोरडे पडले.अंगाची लाही लाही करर्णाया उन्हाने सोयाबीन जाग्यावर करपले. अनेक सोयाबीनच्या फंडात शेंगा होत्या पण दाणा भरला नाही. अनेक सोयाबीनच्या शेंगा व फुले अपुऱ्या ओली अभावी गळून पडली. अशा बिकट संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची हाक सरकारपर्यंत पोहोचल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तालुक्यातील खरोसा येथील पिकांची पाहणी केली. तसेच निलंगा तालुक्यातील जाऊ येथील पिकांची पाहणी केली.याचबरोबर आ. अभिमन्यू पवार यांनी तालुक्यासह मतदारसंघातील पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांना धीर दिला.यावेळी मुख्यमंत्री यांनी दोन दिवसांत दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याचे आश्वासन दिले होते. दुष्काळ जाहीर झाला.याकाळात तालुक्यात मातोळा येथील जिल्हा परिषद सदस्या दीपाली रामभाऊ भोसले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून आवाज उठवला.यानंतर एम आय एम, संभाजी ब्रिगेड संघटना,मनसे,काँग्रेस, राष्ट्रवादी यांनी आंदोलन करून तर छावा संघटनेचे विजयकुमार घाडगे पाटील यांनी उपोषण केले. आंदोलन कर्त्यांनी शेतकऱ्यांना एकरी एक लाख रूपयांचे अनुदान, जनावरांना चारा,थकितसह यावर्षीचा पीक विमा व मजूरांच्या हाताला काम देण्याच्या प्रमुख मागण्या केल्या होत्या. सत्ताधाऱ्यांची पाहणी आणि विरोधकांच्या मागणीमुळे या वर्षी झालेल्या नुकसानीचा व थकितसह यंदाचा पीक विमा, अनुदान दिवाळी पुर्वी मिळेल. अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती.परंतू राज्य सरकारने दिवाळी सण शेतकऱ्यांना साजरा करता यावा.यासाठी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत जाहीर केली.या मदतीमुळे सत्ताधाऱ्यांतच खदखद सुरू झाली आहे. तर पाच हजार रूपयात वर्षांतील सर्वात मोठा सण दिवाळी कसा साजरा करावा. असा भयावह प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. तर राज्य सरकारच्या या मदतीच्या मुद्यावर विरोधक पुढील आंदोलनाच्या तयारीला लागले आहेत.मात्र एकरी लाखाच्या दुखण्याला पाच हजार रूपयांचे अग्रीम मलम सरकारने लावले असल्याचा सूर आता गावकऱ्यांतून दिसत आहे. तर आगामी काळात हाच कळीचा मुद्दा सत्ताधाऱ्यांसाठी घातक ठरणार असल्याचा अंदाज राजकीय वर्तुळातून समोर येत आहे.

रसिका महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन संपन्न

तभा वृत्तसेवा

देवणी दि. १९ ऑक्टोबर : येथील कै. रसिका महाविद्यालयात माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून वाचन चळवळीस प्रेरणा मिळावी व प्रत्येक वाचकास त्यांचा ग्रंथ मिळावा या ग्रंथालय शास्त्राच्या सूत्राची पूर्तता होण्याच्या दृष्टिकोनातून १५ ऑक्टोबर २०२६ रोजी ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सदरील ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचलन उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले. प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांनी प्रत्येक प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आप आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने वायफळ खर्च न करता शालेय ग्रंथालय, सार्वजनिक वाचनालय किंवा महाविद्यालय ग्रंथालयास ग्रंथ भेट देवून वाचन संस्कृती वृद्धिंगत करावे असे आवाहन केले. यावेळी डॉ.प्रशांत भंडे यांनी सर्वांनी दररोज वाचन करणे काळाची गरज असल्याचे आपल्या भाषणात सांगितले. डॉ.गोपाल सोमानी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी वृंद, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी घेतला. ग्रंथ प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी दयानंद रणदिवे, संतोष मुळे, विठ्ठल बिरादार आणि शंकर म्हेत्रे यांनी परिश्रम घेतले.



केंद्रे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची सुंवर्ण झेप



तभा वृत्तसेवा

जळकोट दि. १९ ऑक्टोबर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व के के एम मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर विभागीय मैदानी स्पर्धेमध्ये संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट येथील खेळाडू केंद्रे रमाकांत संभाजी या खेळाडूने तिहेरी उडी मध्ये सुंवर्ण पदक प्राप्त केले. तसेच उंच उडी मध्ये (सिल्वर मेडल) प्राप्त करून निविर्वाद आपले वचर्स्व निर्मान केले. आहे .चमकदार कामगीरी करणाऱ्या सदरील या खेळाडूना क्रिंडा संचालक डॉ तातेराव केंद्रे सराचे अनमोल मार्गदर्शन लाभले आहे .

या यशाबदल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मानवेंद्र केद्रे , संस्थेचे अध्यक्ष डॉ भागवत मानवेंद्र केंद्रे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.टी . लहाने

उपप्राचार्य डॉ व्यंकट पाटील ,अनिल केंद्रे , क्रिडा समितीचे सर्व पदाधिकारी तथा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या दैदिप्यमान कामगिरी केल्याबदल संघाचे प्रशिक्षक क्रिडा संचालक तथा मार्गदर्शक प्रा डॉ तातेराव केंद्रे सर आणि विजयी खेळाडू मुले आणि मुलीचे अभिनंदन करून पुढील उज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत .

दिवाळीत ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी भरारी पथके स्थापन करा

जिल्हाधिकाऱ्यांकडे अ. भा. ग्राहक पंचायतीची निवेदनाद्वारे मागणी

तभा वृत्तसेवा

चाकूर : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठांमध्ये ग्राहकांची होणारी संभाव्य फसवणूक रोखण्यासाठी लातूर जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन आणि वैधमापनशास्त्र विभागाची संयुक्त भरारी पथके स्थापन करून तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य तथा अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले-पाटील आणि सदस्य विवेकानंद वाडीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



दिवाळी काळात मिठाई, खाद्यपदार्थ, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीत मोठी वाढ होते. या काळात व्यापाऱ्यांकडून लकी ड्रॉ, गिफ्ट कूपन, आकर्षक बक्षिसे आणि सवलत योजनांच्या नावाखाली ग्राहकांना आकर्षित केले जाते. मात्र अनेक ठिकाणी अटी-शर्ती स्पष्ट न करणे, दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, बक्षिसाचे आमिष दाखवून खरेदीस प्रवृत्त करणे आणि बक्षीस वितरणात पारदर्शकता न ठेवणे यातून ग्राहकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

तसेच मिठाई व खाद्यपदार्थांची गुणवत्ता, वजनात घट, पॅकबंद वस्तूंवरील एमआरपी, निव्वळ वजन, उत्पादन व कालबाह्य दिनांक, वजन-काटे यातील गैरप्रकार यावर प्रशासनाने लक्ष ठेवावे. शहरी व ग्रामीण बाजारपेठा, दुकाने, शॉपिंग सेंटरची नियमित तपासणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास कठोर कारवाई करावी.

ग्राहकांच्या तक्रारीसाठी स्वतंत्र संपर्क व्यवस्था सुरू करावी, तक्रारींची तातडीने दखल घ्यावी आणि केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल द्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

तरुण भारत Solapur Tarun Bharat
छोट्या जाहिराती/जाहीर प्रगटन / इतर जाहिराती योग्य दरात छापल्या जातील संपर्क –७३८५५६७०३१

औसा शिक्षक पतसंस्थेचा आर्थिक यशाचा नवा विक्रम

सभासदांना सलग चौथ्या वर्षीही ९ % लाभांश वाटप

तभा वृत्तसेवा

औसा दि. १९ ऑक्टोंबर : सभासदांचा विश्वास, पारदर्शक कारभार, आर्थिक शिस्त आणि सभासदहिताला प्राधान्य देणारे धोरण यांच्या बळावर औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून संस्थेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेने तब्बल १ कोटी ६७ लाख ८६ हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे.त्यामुळे सभासदांना सलग चौथ्या वर्षीही ९ टक्के लाभांशाचे वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यातील इतर पतसंस्थांच्या तुलनेत सर्वाधिक लाभांश देण्याची परंपरा कायम राखत संस्थेने आपल्या यशस्वी वाटचालीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब केले आहे. सभासदांच्या लाभांशाची रक्कम त्यांच्या एसबीआय, एलडीसीसी तसेच इतर बँकांमध्ये खाते असलेल्या सभासदांच्या बँक खात्यांवर थेट रक्कम जमा करण्यासाठी धनादेश व बँक यादी दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या औसा शाखेचे व्यवस्थापक प्रणील पीचे यांच्याकडे संस्थेचे चेअरमन महादेव खिचडे यांनी सुपूर्द करून आजच सभासदांच्या बँक खात्यावर लाभांश रक्कमा जमा करण्यात आल्या. यावेळी व्हाईस चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, बँकेचे फिल्ड ऑफिसर जी. आर. भाटकर, इन्स्पेक्टर एस. डी. माळी आदी उपस्थित होते



औसा शिक्षक पतसंस्थेने दि. ०१ जानेवारी २०२३ पासून कर्जाचा व्याजदर बँकेपेक्षा एक टक्का कमी ठेवून १५ लाख रु. कर्ज ९.५०% व्याजदराने वितरण करत मागील तीन वर्षाप्रमाणे सलग चौथ्या वर्षीही ९% लाभांश सभासदांना वाटप केला आहे. संस्थेने १ ऑक्टोबर २०२६ पासून दीर्घ कर्ज २० लाख रु. व आकस्मित कर्ज ८० हजार रु. वाटप सुरु केले आहे. दसरा सणापूर्वी अनेक सभासदांना २७ हजार रुपया पर्यंतच्या लाभांशाच्या रक्कमा सभासदांच्या बँक खात्यांवर जमा झाल्यामुळे सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सणासुदीच्या काळात मिळालेल्या या आर्थिक लाभामुळे सभासदांना मोठा दिलासा मिळाला आहे. संचालक मंडळाने सभासदाच्या विश्वासाहतेमुळे संस्थेत आजरोजी ठेव रु. १५ कोटी, आर.डी. रु. ५ कोटी १८ लाख, भाग भांडवल रु.१५ कोटी १० लाख, कर्ज जीवन हमी रु. ३ कोटी ३१ लाख इत्यादी जमा करून बँकेचे कॅश क्रेडिट कर्ज निरंक करून व संस्थेला स्वबळावर आणले आहे.

सलग चौथ्या वर्षी ९ टक्के लाभांश, कोट्यवधी रुपयांचा निव्वळ नफा, कॅश क्रेडिट कर्जातून मुक्तता आणि सभासदांसाठी वाढविण्यात आलेल्या कर्जमर्यादा यांमुळे औसा शिक्षक पतसंस्थेने सहकार क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. सभासदांचा विश्वास जपत संस्थेची ही यशस्वी वाटचाल भविष्यातही अशीच सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. औसा शिक्षक पतसंस्थेच्या या यशस्वी वाटचालीत संस्थेचे चेअरमन महादेव खिचडे, व्हाईस चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, सर्व संचालक मंडळ, कर्मचारी आणि सभासद यांचे योगदान महत्त्वाचे आहे. सभासदांच्या हिताला प्राधान्य देत आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्हता या मूल्यांच्या आधारावर संस्थेची प्रगती सुरू आहे. संस्थेच्या वतीने सर्व सभासद आणि हितचिंतकांचे आभार व्यक्त करून सर्वांना आगामी दसरा आणि दिवाळी सणाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

CMYK

धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

अजिंक्य प्राथमिक विद्यामंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.१९ ऑक्टोबर -

येथील अजिंक्य प्राथमिक विद्यामंदिरात १७ ऑक्टोबर रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व पालक मेळावा उत्साहात पार पडला. जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या, शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या तसेच मंथन परीक्षेत राज्य, जिल्हा, तालुका व केंद्र स्तरावर प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशी केंद्रप्रमुख सखाराम शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस सहायक निरीक्षक सावंत, गोकर्णा तागडे, करण थोरबोले, नगरसेविका शामल कवडे, संस्थेचे सचिव श्रीधर पवार आणि मुख्याध्यापिका म नीषा माने उपस्थित होते. जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड झालेल्या सुशांत प्रशांत क्षीरसागर आणि पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या सोहमराजे रामहरी जगदाळे यांच्यासह मंथन परीक्षेतील गुणवंतांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार देण्याची जबाबदारी पालकांनी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी क्षीरसागर यांनी केले.

संक्षिप्त वृत्त...



वडगाव काटीत आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते देवीची आरती

धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त तुळजापूर तालुक्यातील वडगाव काटी येथे देवी आईची आरती भक्तिभावाने पार पडली. हलगी, झांज आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात देवीचा जयघोष करण्यात आला. आरतीसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी सर्वांच्या सुख-समृद्धीसह धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भरभराटीसाठी देवीचरणी प्रार्थना करण्यात आली.



आ. कैलास पाटील यांच्या हस्ते धारासुर मर्दिनी देवीची आरती

धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त धाराशिवकरांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री धारासुर मर्दिनी देवीच्या मंदिरात भक्तिमय वातावरणात दर्शन व आरतीचा सोहळा पार पडला. आमदार कैलास पाटील यांनी श्री धारासुर मर्दिनी देवीची आरती करून देवीचे आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांनी आई धारासुर मर्दिनीच्या चरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि सर्वांच्या जीवनात आनंद व समाधान नांदावे, अशी प्रार्थना केली. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या उपासनेतून श्रद्धा, भक्ती आणि सकारात्मकतेचा संदेश दिला जात आहे. धाराशिवकरांच्या श्रद्धेचे प्रतीक असलेल्या श्री धारासुर मर्दिनी देवीच्या चरणी प्रार्थना करून आमदार कैलास पाटील यांनी सर्वांच्या कल्याणाची कामना केली.

अरण्य गोवर्धन मठात शतचंडी यज्ञ; दुष्काळ निवारणासाठी प्रार्थना

तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त अरण्य गोवर्धन मठात दुर्गा सप्तपदी पाठ आणि शतचंडी यज्ञाचे आयोजन करण्यात आले. महंत व्यंकट अरण्य महाराज यांच्या हस्ते होमहवनासह विविध धार्मिक विधी पार पडले. यावेळी महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकट दूर होऊन शेतकरी आणि सर्वसामान्यांना दिलासा मिळावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली. या धार्मिक विधींमध्ये सुनीत पाठक, राजन पाठक, धनंजय पाठक आणि महेश प्रयाग यांनी सहभाग घेतला. यावेळी शिवाजी अमृतराव, रत्नदीप अमृतराव यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.



तुळजापुरात नशामुक्त जनजागृती रॅली

तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर -

नशामुक्त भारत अभियानांतर्गत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त तुळजापूर शहरात नशामुक्त जनजागृती रॅली काढण्यात आली. बालाघाट शिक्षण संस्थेचे सचिव उल्हास बोरगांवकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या रॅलीच्या प्रारंभी कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रवीण भाले यांनी नशामुक्त भारत अभियानाचे महत्त्व विशद केले. महाविद्यालयापासून सुरू झालेली रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. यावेळी नशेच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्यात आली. रॅलीत महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि विविध विभागांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

दुर्गाष्टमीला तुळजाभवानी मंदिरात वैदिक होम-हवनाची पूर्णाहुती!

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सपत्नीक केली पूजा; कोहळा व नारळ अर्पण करून धार्मिक विधी संपन्न...



तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर -

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात सोमवारी (दि. १९ ऑक्टोबर) दुर्गाष्टमीनिमित्त मंदिर परिसरातील होमकुंडावर वैदिक मंत्रोच्चारात होम-हवन विधी पार पडला. यज्ञकुंडात कोहळा व नारळ यांची पूर्णाहुती अर्पण करून धार्मिक विधीची सांगता करण्यात आली. या वेळी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष कीर्ती किरण पुजार यांनी पत्नी सौमय्याश्री पुजार यांच्यासह यजमान म्हणून पूजाविधीत सहभाग घेतला.



शारदीय नवरात्र म होत्सवात दुर्गाष्टमीला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात वैदिक मंत्रोच्चार आणि धार्मिक विधींनी वातावरण भक्तिमय झाले होते. परंपरेनुसार यज्ञकुंडात कोहळा व नारळ यांची पूर्णाहुती देण्यात आली.

दरम्यान, गणेश विहार येथे कोल्हापूर संस्थानच्या वतीने आयोजित होम-हवन विधीत प्रतिपचंद्र प्रयाग व मंदा प्रयाग यांनी, तर हैदराबादच्या रावबहादूर संस्थानच्या वतीने आयोजित विधीत विनीत कोंडो व स्वप्नाली कोंडो यांनी यजमानपद भूषविले.



या प्रसंगी उपविभागीय अधिकारी तथा विश्वस्त ओंकार देशमुख, तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, महंत तुकोजीबुवा, महंत वाकोजीबुवा, उपाध्ये बंडू पाठक, अनंत कोंडो, रामचंद्र पाटील यांच्यासह पुजारी, सेवेकरी, भाविक आणि मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

घराचे कुलूप तोडून १ लाख १० हजारांची रोकड लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

तालुक्यातील तांदुळवाडी येथे अज्ञात चोरट्याने घराच्या दोन्ही दरवाजांचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि धान्याच्या कोठीत ठेवलेली १ लाख १० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. ही घटना १६ ऑक्टोबर रोजी दुपारी १.३० ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान घडली.



रमेश सुखदेव पवार (वय ५०, रा. शेत, गट क्रमांक ५९, तांदुळवाडी, ता. कळंब) यांच्या घरी ही चोरी झाली. याप्रकरणी पवार यांनी १७ ऑक्टोबर रोजी कळंब पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.

दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी गावनिहाय सूक्ष्म नियोजन करा!

पालक सचिव डॉ. राजेश देशमुख यांचे निर्देश; प्रत्येक तालुक्यात ४०० एकरांवर चारा लागवडीचे नियोजन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

जिल्ह्यात सलग ४२ दिवस पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने गावनिहाय सूक्ष्म नियोजन करून उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. संभाव्य पाणीटंचाई आणि चाराटंचाई लक्षात घेऊन आतापासूनच तयारी करावी. शेतकरी, शेतमजूर आणि पशुपालकांना दिलासा देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश पालक सचिव डॉ. राजेश देशमुख यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात १८ ऑक्टोबर रोजी आयोजित



दुष्काळसदृश परिस्थितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर, ज्योती पाटील, निलेश काळे, विजय थोरात आणि विद्याचरण कडवकर उपस्थित होते.

टंचाईग्रस्त गावांचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करावा, पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन टँकर व पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, तसेच जिल्हा व तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करावेत, अशा सूचना डॉ. देशमुख यांनी दिल्या. शेतकऱ्यांना शासकीय मदत वेळेत मिळण्यासाठी आवश्यक नोंदी अद्ययावत ठेवण्यासह पीकविम्याबाबतही दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. धाराशिव शहराला उजनी प्रकल्पातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या जलवाहिनीवरील गळती तातडीने दुरुस्त करावी. आरओ प्रकल्पांमधून वाया जाणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठीही उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा, यासाठी प्रत्येक तालुक्यात सुमारे ४०० एकर क्षेत्रावर चारा लागवडीचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. पाण्याची उपलब्धता असलेल्या गाळपेर आणि गायरान जमिनींचा वापर करून अल्प कालावधीत तयार होणाऱ्या चारा पिकांना प्राधान्य द्यावे. येत्या तीन ते चार दिवसांत या कामाला गती देऊन सुमारे ४५ दिवसांत जनावरांसाठी चारा उपलब्ध होईल, यासाठी प्रयत्न करावेत, असे डॉ. देशमुख यांनी सांगितले.

भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे. बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तयार करून आवश्यक निधीची मागणी करावी. पुढील पावसाळ्यापूर्वी मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे पूर्ण करण्याचे नियोजन करावे. साठवण तलावांतील गाळ काढून शेतजमिनीवर टाकल्यास जमिनीची उत्पादकता आणि तलावांची पाणीसाठवण क्षमता वाढण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

वृद्ध साहित्यिक-कलावंतांचे ५ हजारांचे मानधन अपुरे; किमान १० हजार वाढ देण्याची मागणी



तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.१९ ऑक्टोबर -

राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेंतर्गत वृद्ध साहित्यिक आणि कलावंतांच्या बँक खात्यात दरमहा मिळणारे ५ हजार रुपयांचे मानधन महागाईच्या काळात अपुरे ठरत असल्याची भावना कलावंतांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे शासनाने मानधनात किमान १० हजार रुपयांची वाढ करावी, अशी मागणी होत आहे.

वयाची अनेक वर्षे साहित्य, कला आणि संस्कृतीच्या सेवेत घालविणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना सध्या मिळणाऱ्या मानधनातून दैनंदिन गरजा भागविताना अडचणी येत आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, औषधोपचार आणि इतर खर्च लक्षात घेता हे मानधन अपुरे पडत असल्याचे कलावंतांचे म्हणणे आहे.

ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांच्या योगदानाचा विचार करून शासनाने त्यांच्या मानधनात वाढ करावी. केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी वृद्ध साहित्यिक व कलावंतांकडून केली जात आहे.

नितीन शेरखाने यांच्यासह सांजातीलकार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

स्थानिक राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तसेच शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत नितीन शेरखाने यांच्यासह सांजा गावातील असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या घडामोडीमुळे धाराशिव शहर आणि परिसरातील राजकीय वर्तुळात चर्चेला सुरुवात झाली आहे.

विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रांत कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या पक्षप्रवेशामुळे स्थानिक पातळीवर पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे.

या पक्षप्रवेशात नितीन शेरखाने, गफूर भाई शेख, शंकर सूर्यवंशी, मालोजी भैय्या सूर्यवंशी, रवी रोहिदास, संजय रोहिदास धावारे, प्रतीक शेरखाने, प्रेम शेरखाने, पद्माकर शेरखाने यांच्यासह आदिंनी प्रवेश केला

या कार्यक्रमाला प्रदीप मुंडे, पप्पू मुंडे, तुषार निंबाळकर, पृथ्वीराज चिलवंत, भीमा जाधव, लिंबराज डुकरे, गणेश जगताप, विकास जाधव, रवी कोरे, कृष्णा मुंडे, आदित्य हंबीरे, सह्याद्री राजेनिंबाळकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

धाराशिव जिल्ह्यात ५.९५ लाख पशुधन; उपलब्ध चारा डिसेंबरपर्यंतच!

दररोज २,३०६ मेट्रिक टन वैरणीची गरज; दुष्काळात पशुधन जगविण्याचे प्रशासनासमोर आव्हान

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

जिल्ह्यात सलग पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीबरोबरच पशुपालन व्यवसायावरही संकटाचे सावट आहे. जिल्ह्यात २१ व्या पशुगणनेनुसार एकूण ५ लाख ९५ हजार ८४४ पशुधन असून, त्यांच्यासाठी दररोज सुमारे २ हजार ३०६ मेट्रिक टन वैरणीची आवश्यकता आहे. सध्या उपलब्ध असलेला आणि आगामी काळात उपलब्ध होणारा एकूण १ लाख ८५ हजार ४०० मेट्रिक टन चारा डिसेंबर २०२६ पर्यंत पुरेल, असा अंदाज पशुसंवर्धन विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे त्यापुढील काळात चारा उपलब्धतेचे नियोजन करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

धाराशिव जिल्ह्यात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाला मोठे महत्त्व आहे. दूध उत्पादनातून मिळणारे नियमित उत्पन्न शेतकरी कुटुंबांच्या उदरनिर्वाहाला आधार देते. शेळ्या-मेंढ्यांचे पालन हा अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांसाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. मात्र, दुष्काळामुळे हिरव्या चाऱ्याचे उत्पादन घटण्याची शक्यता असल्याने पशुधनाच्या पोषणाचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. जिल्ह्यात ५ लाख ९५ हजार पशुधन २१ व्या पशुगणनेनुसार (२०२५) जिल्ह्यात मोठ्या पशुधनाची संख्या ३ लाख २२ हजार ८०३, लहान पशुधनाची संख्या ४८ हजार २३३, तर शेळ्या व मेंढ्यांची संख्या २ लाख २४ हजार ८०८ आहे. अशा प्रकारे जिल्ह्यात एकूण ५ लाख ९५ हजार ८४४ पशुधन आहे. या पशुधनावर हजारो शेतकरी आणि पशुपालक कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. दररोज २,३०६ मेट्रिक टन चाऱ्याची गरज जिल्ह्यातील पशुधनासाठी दररोज मोठ्या प्रमाणात चाऱ्याची आवश्यकता आहे.

त्यामध्ये मोठ्या पशुधनासाठी १ हजार ९३६.८२ मेट्रिक टन, लहान पशुधनासाठी १४४.७० मेट्रिक टन, तर शेळ्या व मेंढ्यांसाठी २२४.८ मेट्रिक टन वैरणीची गरज भासते. एकूण गरज लक्षात घेता, उपलब्ध चाऱ्याचा काटकसरीने वापर आणि पर्यायी चारा निर्मितीवर भर देणे आवश्यक आहे. पशुधनाचे महत्त्व केवळ दूध उत्पादनापुरते मर्यादित नाही.

शेतीच्या कामांसाठी बैलांचा उपयोग, शेणखताद्वारे जमिनीची सुपीकता वाढविणे, तसेच दूध संकलन, वाहतूक, दुग्धप्रक्रिया आणि पशुखाद्य विक्री यांसारख्या पूरक व्यवसायांनाही पशुपालनामुळे चालना मिळते. त्यामुळे चारा व्यवस्थापनाचा प्रश्न ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट जोडलेला आहे. पर्यायी चारा निर्मितीवर भर आवश्यक



उपलब्ध चारा डिसेंबरपर्यंत पुरण्याचा अंदाज असला, तरी त्यानंतरची गरज लक्षात घेऊन आतापासूनच नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध कडबा, वाळलेला चारा, उसाचे वाढे आणि अन्य पर्यायी चारा स्रोतांचा योग्य वापर करावा लागणार आहे. त्याचबरोबर पाण्याची उपलब्धता असलेल्या जमिनींवर चारा पिकांची लागवड, चारा साठवण आणि पशुधनाच्या गरजेनुसार वितरण यावर भर देणे गरजेचे आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनाचे संरक्षण करणे म्हणजे शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक सुरक्षिततेचे रक्षण करणे होय. त्यामुळे चाऱ्याची उपलब्धता, पाणीपुरवठा आणि पर्यायी चारा निर्मिती यांचे प्रभावी नियोजन झाल्यास आगामी काळातील संभाव्य संकटाची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते.

चाऱ्याच्या टंचाईचा दूध उत्पादनाला फटका?

दुष्काळामुळे शेतीच्या उत्पन्नात घट झाली, तरी दूध उत्पादनातून मिळणारे उत्पन्न शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार देते. मात्र, जनावरांना पुरेसा चारा आणि पाणी मिळाले नाही, तर त्यांच्या आरोग्यावर तसेच दूध उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यामुळे पशुपालकांच्या उत्पन्नावरही विपरीत परिणाम होऊ शकतो.



CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

आळणीतील नवरात्र महोत्सवाला खासदार ओमराजे निंबाळकर यांची भेट

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आळणी येथे आयोजित वीरशैव जय तुळजाभवानी नवरात्र महोत्सवाला खासदार ओमराजे निंबाळकर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी आई तुळजाभवानीचे दर्शन घेऊन सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी तसेच शेतकरी बांधवांवरील संकटे दूर होऊन त्यांना दिलासा मिळावा, अशी प्रार्थना केली.



यावेळी अंबरुषी आप्पा कोरे, रवि कोरे आळणीकर, काशिनाथ पौळ, हरिदास म्हेत्रे, अनंत खोबरे, शाम लावंड, श्रीपाल वीर, राजेंद्र नांदे यांच्यासह भाविक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

नवरात्र महोत्सवानिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

संक्षिप्त वृत्त...



पायी येणाऱ्या देवीभक्तांसाठी रामदिन परिवाराचे अन्नदान

तुळजापूर, दि.१९ ऑक्टोबर -

श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी पायी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी महावीर लोध धर्मशाळा, तुळजापूर आयोजित रामदिन परिवारातर्फे तुळजापूर-नळदुर्ग राज्य मार्गावरील देवसिंगा (तूळ) येथे सलग चार दिवस अन्नदानाचा उपक्रम राबविण्यात आला. शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविक पायी तुळजापूरकडे येत आहेत. प्रवासादरम्यान भाविकांना भोजनाची सुविधा मिळावी, या उद्देशाने रामदिन परिवाराने हा सेवाभावी उपक्रम आयोजित केला. अनेक देवीभक्तांनी या अन्नदानाचा लाभ घेतला. यावेळी महावीर लोध धर्मशाळेचे मालक रामदिन जगदीश सिंग, रामदिन रवी सिंग आणि व्यवस्थापक दत्ता राठोड उपस्थित होते. भाविकांना भोजनसेवा देत रामदिन परिवाराने नवरात्रोत्सवात सामाजिक बांधिलकी जपली.

महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी किशोर पवार

नळदुर्ग, दि.१९ ऑक्टोबर -

महासंघ, भारताच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी किशोर दादा पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. महासंघाच्या राष्ट्रीय निवड समिती आणि महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. पवार हे गेल्या सहा ते सात वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असून, जनहिताचे प्रश्न आणि ग्रामीण भागातील समस्यांना त्यांनी वाचा फोडली आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्यभर संघटनेचा विस्तार करणे, पत्रकारांचे प्रश्न मांडणे, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी पाठपुरावा करणे तसेच शासकीय योजना व कायदेशीर मार्गदर्शन पत्रकारांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले.





नळदुर्गच्या 'होम मिनिस्टर' पदी आकांक्षा कुलकर्णी

नळदुर्ग, दि.१९ ऑक्टोबर -

शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त श्री अंबाबाई देवस्थान ट्रस्ट व मंदिर जीर्णोद्धार समितीच्या वतीने १७ ऑक्टोबर रोजी मंदिर सभागृहात महिलांसाठी आयोजित 'होम मिनिस्टर' कार्यक्रम उत्साहात पार पडला. या स्पर्धेत आकांक्षा कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक मिळवत नळदुर्गच्या 'होम मिनिस्टर' होण्याचा मान पटकावला, तर सोनाली मोटे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. विजेत्यांचा मानाची पैठणी देऊन सन्मान करण्यात आला. संगीता चनशेट्टी आणि वर्षा देवकते (सोलापूर) यांनी कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नगरसेविका मीनाक्षीताई काळे, वैशाली उकंडे, मीनल कासार आणि परळकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन मंदिर ट्रस्टचे सुरेश गायकवाड, जीर्णोद्धार समितीचे सदस्य



सरदारसिंग ठाकूर, सुनील उकंडे, दत्तात्रय वाघमारे, शहर शिवसेनाप्रमुख संतोष पुदाले, उपशहरप्रमुख सोमनाथ म्हेत्रे आणि नेताजी महाबोले यांनी केले. कार्यक्रमाला नळदुर्ग शहरातील महिलांची मोठी उपस्थिती होती.

उमरा शाळेत 'नवदुर्गा' कार्यक्रम; विद्यार्थिनींच्या वेशभूषेने वेधले लक्ष

येरमाळा, दि.१९ ऑक्टोबर -

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरा येथे शनिवार, दि.१७ ऑक्टोबर रोजी 'नवदुर्गा' कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींनी नवदुर्गेच्या नऊ रूपांची आकर्षक वेशभूषा साकारली. कन्यापूजन आणि गरबा नृत्याने कार्यक्रमाची रंगत वाढवली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि सामाजिक प्रश्नांविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक विषयांवर आपली मते मांडली. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन जाधव, उपाध्यक्ष नारायण जाधव यांच्यासह ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महादेव जाधव आणि समाधान बाराते यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

पाच हजारांत दिवाळी कशी साजरी करायची? दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा संतप्त सवाल!

आप्पासाहेब शिंदे
परंडा, दि.१९ ऑक्टोबर -

एकीकडे दुष्काळाचे भीषण संकट, दुसरीकडे महागाईचा वाढता भडका आणि तोंडावर आलेली दिवाळी अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेली पाच हजार रुपयांची अग्रीम सानुग्रह मदत शेतकरी व सर्वसामान्य कुटुंबांसाठी पुरेशी ठरणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. शेतीतून उत्पन्न नाही, हाताला काम नाही आणि खर्चाचा डोंगर वाढत असताना या तुटपुंज्या रकमेत दिवाळी साजरी करायची कशी, अशी व्यथा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

परंडा तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या हाती अपेक्षित उत्पादन न आल्याने आर्थिक गणित कोलमडले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला



असून, आगामी काळातील संकटांची चिंता त्यांना सतावत आहे.

पिकांच्या नुकसानीबरोबरच जनावरांच्या चारा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनत आहे. पाणीटंचाई वाढल्यास शेतकरी कुटुंबांसह पशुधनाच्या जगण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे. अशा परिस्थितीत भरीव आर्थिक मदत आणि ठोस उपाययोजनांची गरज असताना पाच हजार रुपयांच्या मदतीतून कितपत दिलासा मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. किराणा, भाजीपाला आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक नियोजन बिघडले आहे.

उत्पन्नाचे स्रोत कमी होत असताना घरखर्च, मुलांच्या गरजा आणि सणाचा खर्च भागविण्याचे आव्हान कुटुंबांसमोर आहे. त्यामुळे यंदाची दिवाळी अनेकांसाठी आनंदापेक्षा चिंतेची ठरण्याची शक्यता आहे.

गाठला तळ; पाणी पिण्यासाठी राखीव

परंडा तालुक्यातील सिना-कोळेगाव धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने पाणीटंचाईचे संकट गडद होत आहे. उपलब्ध पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्याची परिस्थिती निर्माण झाल्यास शेतीला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यातच जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केवळ तुटपुंज्या मदतीच्या घोषणेवर समाधान मानावे लागणार नाही, यासाठी शासनाने भरीव आर्थिक मदत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि जनावरांसाठी चारा-पाण्याच्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मंत्रिमंडळ विस्तारात तानाजी सावंतांना पुन्हा संधी? शिंदे नाराजी दूर करणार का?

तभा वृत्तसेवा
वाशी, दि.१९ ऑक्टोबर -

राज्यात आगामी मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांना वेग आला असतानाच शिवसेनेच्या शिंदे गटाचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री आमदार तानाजीराव सावंत यांच्या संभाव्य मंत्रिपदाची चर्चा पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. सावंत यांना पुन्हा मंत्रिपदाची संधी मिळणार का आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या नाराजीची दखल घेणार का, याकडे धाराशिव जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.



गेल्या काही दिवसांपासून तानाजीराव सावंत नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर आगामी मंत्रिमंडळ विस्तारात त्यांना संधी देऊन नाराजी दूर करण्याचा प्रयत्न होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, सावंत समर्थकांकडून सोशल मीडियावर लवकरच मंत्रिपद मिळण्याचे संकेत देणारे स्टेटस ठेवले जात असल्याने या चर्चेला अधिक हवा मिळाली आहे.

यापूर्वी 'तरुण भारत'नेही सावंत यांच्या संभाव्य मंत्रिपदाबाबत वृत्त प्रसिद्ध केले होते. आता पुन्हा मंत्रिमंडळ विस्ताराच्या हालचालींची चर्चा सुरू झाल्याने त्या वृत्ताची राजकीय वर्तुळात आठवण काढली जात आहे. विस्तारात काही विद्यमान मंत्र्यांना डच्चू देऊन नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे तानाजीराव सावंत यांच्या नावावर पुन्हा मंत्रिपदाची मोहोर उमटणार का, की त्यांच्या पदरी पुन्हा प्रतीक्षाच पडणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, यासंदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. आगामी मंत्रिमंडळ विस्तारात शिंदे कोणता निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

यमगरवाडी येथे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या वतीने एकलव्य विद्या संकुल, मंगरूळ यमगरवाडी येथे दोन दिवसीय विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिरात ३० मुली व २६ मुले असे एकूण ५६ विद्यार्थी सहभागी झाले होते. शिबिरात विविध विषयांवरील आठ सत्रांचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते तथा माजी मुख्याध्यापक सतीश खोपडे यांच्या हस्ते झाले. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धवराव काळे यांनी भटके विमुक्त समाजाच्या समस्या व सद्यस्थिती मांडत विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे, असे आवाहन केले.

शिबिरात आनंददायी खेळ, योग व प्राणायाम, अभ्यास कौशल्य, चर्चासत्र तसेच भटके विमुक्त समाजाची स्थिती या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. राजेंद्र मेहता यांची मुलाखतही घेण्यात आली. शिबिराचा समारोप धनंजय माटेफळकर यांच्या मार्गदर्शनाने झाला. विद्यार्थ्यांनी स्वतःचा विकास करण्यासोबतच समाजाप्रती सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा, असे त्यांनी सांगितले. शिबिराची संकल्पना भटके विमुक्त विकास परिषदेचे संघटनमंत्री राहुल चव्हाण यांची होती. हरीश मगदूम यांनी शिबिराचे संचालन केले.

महावितरणच्या ठिणगीने एक एकर ऊस जळून खाक; अडीच लाखांचे नुकसान!

देवसिंगा नळ येथील घटना; नुकसानभरपाईची मागणी

तभा वृत्तसेवा
मंगरूळ, दि.१९ ऑक्टोबर -

तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा नळ येथे महावितरणच्या लोंबकळणाऱ्या वीजतारांमधील घर्षणातून ठिणगी पडल्याने एका तरुण शेतकऱ्याचा एक एकर ऊस जळून खाक झाला. या आगीत ठिबक सिंचन संच, पाइप आणि वायरही जळाल्याने शेतकरी शेकुंबर सिलेमान शेख यांचे सुमारे दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

देवसिंगा नळ येथील शेतकरी शेकुंबर शेख यांच्या गट क्रमांक ५६ मधील शेतात ही घटना घडली. शेताच्या बांधावरून गेलेल्या वीजतारांमध्ये वाऱ्यामुळे घर्षण होऊन ठिणगी



उसाच्या शेतात पडल्याचे सांगण्यात येत आहे. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले आणि उभ्या उसासह ठिबक सिंचन संच, पाइप व वायर जळून खाक झाले.

आग विझवण्यासाठी शेतकरी आणि गावकऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, जोरदार वाऱ्यामुळे आग आटोक्यात आणण्यात अडचणी आल्या. दुष्काळाच्या झळा सहन करत आणि कर्ज काढून उभे केलेले ऊसपीक डोळ्यांदेखत जळून गेल्याने शेख कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे.

परिसरातील अनेक ठिकाणी वीजतारा लोंबकळत असून, काही तारा नादुरुस्त असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वारंवार तक्रारी करूनही महावितरणकडून दुर्लक्ष होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे वीजतारांच्या देखभालीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

तेरखेड्याच्या १३ कोटींच्या पाणी योजनेचा हिशेब कधी उघडणार?

तेरखेडकरांचा 'हर घर जल'चा प्रश्न ऐरणीवर!

तभा वृत्तसेवा
तेरखेडा, दि.१९ ऑक्टोबर -

वाशी तालुक्यातील तेरखेडा गावासाठी राबविण्यात येत असलेली सुमारे १३ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना रखडल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

'हर घर जल' योजनेंतर्गत प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट असताना, अद्याप योजनेची कामे अपूर्ण असल्याने ग्रामस्थांना प्रत्यक्ष पाणीपुरवठ्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. योजनेअंतर्गत पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. मात्र, तलावापासून टाकीपर्यंतची पाइपलाइन आणि गावातील अंतर्गत पाइपलाइनची कामे पूर्ण झाली आहेत की नाहीत, तसेच प्रत्यक्ष पाणीपुरवठा कधी सुरू होणार, याबाबत स्पष्टता नसल्याने ग्रामस्थांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या योजनेसाठी नेमका किती निधी मंजूर झाला, आतापर्यंत किती खर्च झाला, ठेकेदाराला किती बिले अदा केली आणि कोणती कामे अद्याप बाकी आहेत, याची माहिती सार्वजनिक करण्याची मागणी होत आहे.



काम रखडण्यामागील कारणे आणि काम पूर्ण करण्याची निर्धारित मुदत याबाबतही संबंधित विभागाने खुलासा करावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

विद्यमान ठेकेदाराकडून उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण होणार नसतील, तर शासनाच्या नियमानुसार पुढील कार्यवाही करून नवीन ठेकेदाराची नियुक्ती करावी आणि योजना तातडीने पूर्ण करावी, अशी मागणीही होत आहे.

कोट्यवधींचा निधी खर्च होऊनही ग्रामस्थांना पाण्याची प्रतीक्षा करावी लागत असेल, तर योजनेच्या अंमलबजावणीचा हिशेब कोण देणार? असा सवाल उपस्थित होत आहे.

संबंधित विभागाने योजनेचा खर्च, अपूर्ण कामांचा तपशील आणि पाणीपुरवठा सुरू करण्याची ठोस कालमर्यादा जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

सायबर गुन्ह्यांपासून सावध राहा; मुलींनी अन्यायाविरोधात आवाज उठवावा : चोरमले

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.१९ ऑक्टोबर -

विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती आणि मुलींच्या वैयक्तिक सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी बावची विद्यालय व वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने १७ ऑक्टोबर रोजी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.



परंडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, अनोळखी लिंक आणि डिजिटल व्यवहारांतील खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती व पासवर्ड शेअर करू नयेत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच मुलींनी कोणत्याही अनुचित प्रसंगात न घाबरता पालक, विश्वासू व्यक्ती किंवा पोलिसांची मदत घ्यावी, असे सांगितले.

धाराशिवमध्ये पाणीटंचाईचे संकट; २८६ विहिरींचे अधिग्रहण, टँकरने पाणीपुरवठा सुरू

नऊ गावांना १२ टँकरद्वारे पाणी; ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाच्या उपाययोजना...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.१९ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय सहन करावी लागू नये,यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. पाण्याचे उपलब्ध स्रोत,टँकरद्वारे पाणीपुरवठा तसेच खासगी विहिरींच्या अधिग्रहणाच्या माध्यमातून नागरिकांची तहान भागविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जिल्ह्यात सध्या नऊ गावांना १२ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून,पाणीटंचाई निवारणासाठी एकूण २८६ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाच्या १७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पाणीपुरवठा अहवालातून ही माहिती समोर आली आहे.जिल्ह्यातील काही भागांत पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याने नागरिकांना दिलासा देण्यासाठी टँकर आणि विहीर अधिग्रहणाच्या माध्यमातून पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात येत आहे.



टँकरच्या माध्यमातून पाणी पोहोचविण्याबरोबरच स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या जलस्रोतांचा उपयोग करून पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याचा प्रयत्न या उपाययोजनांमधून करण्यात येत आहे. पाणीटंचाईची सर्वाधिक झळ ग्रामीण भागातील नागरिकांना बसते. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ लक्षात घेता, गावातच पाणी उपलब्ध होणे महत्त्वाचे ठरते. टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा आणि खासगी विहिरींच्या अधिग्रहणामुळे पाणीटंचाईग्रस्त भागातील कुटुंबांना दिलासा मिळण्यास मदत होत आहे.

पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी नागरिकांना दूरवर जावे लागू नये,यासाठी स्थानिक जलस्रोतांचा प्रभावी वापर, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि गरजेनुसार पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे. जिल्ह्यातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता, आगामी काळात पाण्याच्या उपलब्ध साठ्यांचे संरक्षण करणे,उपलब्ध जलस्रोतांचा काटकसरीने वापर करणे आणि नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा होईल याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असलेल्या गावांमध्ये पाण्याचे वितरण सुरळीत राहणे,तसेच अधिग्रहित विहिरींच्या माध्यमातून होणारा पाणीपुरवठा कायम राखणे महत्त्वाचे ठरणार आहे. पाणीटंचाईच्या काळात प्रत्येक थेंबाचे महत्त्व वाढते.त्यामुळे प्रशासनाच्या उपाययोजनांबरोबरच नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करणे,पाण्याचा अपव्यय टाळणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे गरजेचे आहे.

धाराशिव तालुक्यात सर्वाधिक सात टँकर...

धाराशिव तालुक्यातील पाच गावांमध्ये सात टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.यामध्ये कोडगाव (बावी) येथे एक, कजरखेडा येथे एक,बोरखेडा येथे एक,पळसप येथे तीन आणि नांदुर्गा येथे एक टँकर सुरू आहे. उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे दोन,बलसूर येथे एक आणि आनंदनगर येथे एक,असे चार टँकर सुरू आहेत. लोहारा तालुक्यातील सास्तूर येथे एक टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तुळजापूर, कळंब, भूम, वाशी आणि परांडा या पाच तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू नाही.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी २८६ विहिरींचे अधिग्रहण

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी प्रशासनाने खासगी विहिरींच्या अधिग्रहणावरही भर दिला आहे. जिल्ह्यात एकूण २८६ खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून,त्यापैकी नऊ विंधन विहिरी टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी,तर २७७ विहिरी टँकरव्यतिरिक्त पाणीपुरवठ्यासाठी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.